cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-५८ | रविवार दि.१७ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### इंधन दरवाढीचा भडका

अखेर पेट्रोल-डिझेल दरवाढीची भीती खरी ठरली. गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत होत्या. अमेरिका-इराण संघर्षामुळे पश्चिम आशियातील तणाव आणखी वाढला आणि त्याचा थेट परिणाम भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांवर झाला. भारताच्या इंधन गरजेपैकी तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक गरज आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेतील किंचित हालचालही भारतीय अर्थव्यवस्थेच्या नसानसांत जाणवते.

# खरीप हंगामासाठी कृषि विभागाचा नियंत्रण कक्ष सुरु

## बियाणे, खते आणि किटकनाशकांबाबत तक्रारींसाठी हेल्पलाइन उपलब्ध

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि किटकनाशकांचा दर्जेदार व मुबलक पुरवठा वेळेत उपलब्ध व्हावा, यासाठी कृषि विभागाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मा. आयुक्त कृषि यांच्या आढावा बैठकीत शेतकरी, वितरक आणि विक्रेत्यांना क्षेत्रीय स्तरावर भेडसावणाऱ्या विविध अडचणींचे तातडीने निवारण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.**



महाराष्ट्रातील शेती व्यवस्था मोठ्या प्रमाणावर खरीप हंगामावर अवलंबून आहे. शेतकरी खरीप हंगाम यशस्वी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात मेहनत घेत असताना बियाणे, खते आणि किटकनाशके या निविष्ठांचा वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण पुरवठा होणे अत्यावश्यक मानले जाते. याच पार्श्वभूमीवर कृषि आयुक्तालय स्तरावर विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. शेतकरी, वितरक तसेच विक्रेत्यांच्या तक्रारी आणि अडचणी तत्काळ नोंदवून त्यांचे निराकरण करण्यासाठी व्हॉट्सअॅप क्रमांक ९८२२४४६६५५ उपलब्ध करून देण्यात आला आहे. तसेच कृषि विभागाचा टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ४००० वरही संपर्क साधता येणार आहे. याशिवाय ई-मेलद्वारेही तक्रारी नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. कृषि विभागाने स्पष्ट केले आहे की, निविष्ठांची गुणवत्ता, वाढीव किंमत, साठेबाजी, लिंकींग अथवा अन्य कोणत्याही प्रकारच्या अडचणींबाबत तक्रार नोंदविताना तक्रारदाराने आपले नाव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि तक्रारीचा संक्षिप्त तपशील देणे आवश्यक राहणार आहे. कोऱ्या कागदावर माहिती लिहून ◀◀ पान २ वर

# मनोज जरांगेंचे ३० मे पासून आंतरवाली सराटीत उपोषण

## सरकारपुढे ठेवल्या अनेक मागण्या, सरकारच्या भुमिकेकडे लक्ष

जालना । प्रतिनिधी

**मराठा आरक्षणाच्या मुद्यावरुन मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा एल्गार पुकारला आहे. त्यांनी ३० मे पासून आंतरवाली सराटीत बेमुदत उपोषणाला बसणार असल्याची घोषणा केली आहे. जरांगे पाटील यांनी आज आंतरवाली सराटीत आंदोलनाबाबत पुढील दिशा ठरवण्यासाठी बैठक घेतली. यावेळी त्यांनी सरकारवर वारंवार मराठा समाजाची फसवणूक केल्याचा आरोप केला. दरम्यान, जरांगे पाटलांच्या उपोषणाच्या या इशाऱ्यानंतर फडणवीस सरकार काय भुमिका घेणार, याकडे लक्ष लागले आहे.**

कधीही झाले नाही, असे मोठे आंदोलन होईल, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्याबद्दल माझे मत वाईट नाही. पण मला माझ्या समाजातील मुलांच्या



चेहऱ्यावर आनंद बघायचा आहे. त्यासाठी मी जिवाचे रान केले आहे. तुम्ही हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला. पण तुम्ही आमचे प्रमाणपत्र का रोखले? असा सवाल जरागेंनी मुख्यमंत्र्यांना उद्देशून केला. ज्या काही ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्यांना कोणत्याही विलंबाविना प्रमाणपत्रे द्यावीत. आंदोलनाच्या तारखेच्या आधी याची कार्यवाही केली नाही तर कुणालाही सोडले जाणार नाही. कुणबी प्रमाणपत्रांचे तातडीने वाटप सुरु करायला हवे. सातारा संस्थानचा जीआर तुम्ही का काढत नाही.? आठ महिने वेळ दिला. सातारा, कोल्हापूर, औंध, पुणे संस्थान गॅझेटचा जीआर काढून त्याची अंमलबजावणी करावी. हा जीआर १९९४ धर्तीवर असावा. मराठा आरक्षण उपसमिती काही काम करत नाही. ही उपसमिती मराठ्यांमध्ये भांडण लावत असून ती बरखास्त करावी. शिंदे समितीला मुदतवाढ द्यावी. मराठा आंदोलकांवरील सर्व गुन्हे मागे घ्यावेत, अशा मागण्या जरागेंनी सरकारपुढे ठेवल्या आहेत. माझ्या विरोधात बोलण्यासाठी काही ◀◀ पान २ वर

# ...तर अध्यक्षपादाचा राजीनामा देइन-विखे पाटील

अहिल्यानगर । प्रतिनिधी



जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरुन मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर शनिवारी सडकून टीका केली. या सर्व घडामोडींनंतर आता राधाकृष्ण विखे पाटील यांनी मंत्रिमंडळ उपसमितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यास आपण तयार असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या या वक्तव्यावर आता मनोज जरांगे काय भूमिका मांडतात ते पाहणे महत्त्वाचे आहे.

मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. राज्य सरकारने २९ मे पर्यंत मराठवाड्यातील मराठा समाजाच्या नागरिकांना कुणबी प्रमाणपत्र द्यावे. अन्यथा ३० मे पासून आमरण उपोषण करणार, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. मनोज जरांगे गेल्या काही दिवसांपासून सातत्याने याबाबत मागणी करत आहेत. मनोज जरांगे ◀◀ पान २ वर

# नीट पेपरफुटीतील आरोपी प्रा.कुलकर्णींचा बीडशी संबंध

## ● शहरात त्याचे मोठे बांधकाम सुरू तर खासगी क्लासेसवाल्यांशीही संबंध असल्याची चर्चा

बीड । प्रतिनिधी

नीट पेपरफुटी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या पी. व्ही. कुलकर्णींचे बीड कनेक्शन समोर आले आहे. प्रा.कुलकर्णींचे बालपण आणि प्राथमिक शिक्षण बीडमध्येच झाले. त्याचे वडिलही बीड जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून कार्यरत होते. पी.व्ही.कुलकर्णींचे शहरातील शाहुनगर भागात वास्तव्य होते. त्याच ठिकाणी कुलकर्णींचे इमारतीचे



बांधकाम सुरू आहे. शहरातील काही क्लासेस चालकांसोबत त्याचे स्नेहाचे संबंध होते. त्या स्नेहातूनच उत्तरपत्रिका बीडमध्ये का पोहोचली नसावी असा संशय व्यक्त होत असताना आता अनेक तक्रारी समोर येऊ लागल्या आहेत.

देशात आणि राज्यात मोठी घटना घडली आणि त्याचे कनेक्शन बीडपर्यंत नाही जुळले तर शक्यच नाही. चार-पाच दिवसांपासून पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणात बीडचे नाव समोर कसे काय येत नाहीय असे आश्चर्य वाटत असताना चकीत करणारी माहिती समोर आली आहे. पेपरफुटीचा मास्टरमाईंड पी.व्ही.कुलकर्णी हा बीडचा निघाला. त्याचे बालपण, महाविद्यालयीन ◀◀ पान २ वर

# २० मे रोजी देशभरातील मेडिकल सेवा राहणार बंद

## ई-फार्मसी आणि ऑनलाइन औषध विक्रीच्या निषेधार्थ केमिस्ट संघटनेचा निर्धार

मुंबई । प्रतिनिधी

ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स अँड ड्रगिस्ट्सने २० मे २०२६ रोजी देशभरातील मेडिकल दुकाने आणि औषध वितरक बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. ई-फार्मसी कंपन्यांविरोधात आणि ऑनलाइन औषध विक्रीवरील अपुऱ्या नियमनाच्या निषेधार्थ हा एकदिवसीय बंद पुकारण्यात आला आहे. देशभरातील सुमारे १२.४० लाख केमिस्ट दुकाने आणि ड्रग डिस्ट्रीब्यूटर्स या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

महाराष्ट्रासह गुजरात, दिल्ली, उत्तर प्रदेश,



आसाम, गोवा आणि नागालँडमध्ये या बंदचा मोठा परिणाम जाणवण्याची शक्यता आहे. विशेषतः मुंबई, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या शहरांमध्ये अनेक मेडिकल स्टोअर्स बंद राहू शकतात. ◀◀ पान २ वर

# 'तरुणांना झुरळ म्हटले नाही'

## वादानंतर सूर्यकांत यांचे स्पष्टीकरण, माध्यमांवर चुकीच्या रिपोर्टिंगचा आरोप

दिल्ली । वृत्तसंस्था

भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांबाबत केलेल्या कथित 'झुरळ' टिप्पणीवरून निर्माण झालेल्या वादानंतर स्पष्टीकरण दिले आहे. आपल्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ लावण्यात आल्याचे सांगत, आपण देशातील तरुणांवर टीका केली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयातील एका सुनावणीदरम्यान सर न्यायाधीश सूर्यकांत यांनी काही तरुणांबाबत केलेल्या वक्तव्यावरून सोशल मीडियावर मोठा वाद निर्माण झाला होता. बेरोजगार तरुण झुरळांसारखे होतात आणि नंतर मीडिया, सोशल मीडिया किंवा आरटीआय कार्यकर्ते बनून ◀◀ पान २ वर

# भाजपच्या गंभीर आरोपांनतर कॉंग्रेसकडून मोदींचा एआय व्हिडिओ शेअर

## विदेशी दौऱ्यांवरून घमासान, भाजपा-कॉंग्रेसमध्ये जुंपली

दिल्ली । वृत्तसंस्था

पश्चिम आशियातील युद्धामुळे उद्भवलेल्या इंधन संकटामुळे परदेश दौरे रद्द करण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. आता याच विदेशी दौऱ्यावरुन भाजप आणि कॉंग्रेसमध्ये आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. राहुल गांधी यांनी गेल्या २२ वर्षांत केलेल्या परदेश दौऱ्यांविषयी भाजपने आरोपांची मालिकाच सोशल मीडियावर पोस्ट केली आहे. तर कॉंग्रेसने एक एआय-जनरेटेड व्हिडिओ शेअर करत पंतप्रधान मोदींचा परदेश दौऱ्यांच्या खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत. ◀◀ पान २ वर




# तिसऱ्या अपत्यासाठी ३० हजार, चौथ्यासाठी ४० हजार!

## लोकसंख्या वाढवण्यासाठी आंध्र सरकारची खास योजना

विजयवाडा । वृत्तसंस्था

**राज्यातील घटत्या लोकसंख्येचा आलेख उंचावण्यासाठी आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी मोठी घोषणा केली आहे. राज्यातील कुटुंबांना तिसऱ्या अपत्याच्या जन्मावर ३० हजार रूपये आणि चौथ्या अपत्याच्या जन्मावर ४० हजार रुपयांचे आर्थिक प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी जाहीर केले.**

शनिवारी श्रीकाकुलम जिल्ह्यातील नरसन्नापेटा येथे





एका जाहीर सभेला संबोधित करताना नायडू म्हणाले की, सरकारने हा निर्णय घेतला असून पुढील एका महिन्यात याचे सविस्तर तपशील जाहीर केले जातील. स्वर्णांध्र-स्वच्छांध्र स्वच्छता मोहिमेच्या दरम्यान बोलताना नायडू म्हणाले, मी एक नवीन निर्णय घेतला आहे. तिसऱ्या अपत्याच्या जन्मानंतर लगेचच आपण ३० हजार रुपये आणि चौथ्या अपत्यासाठी ४० हजार रुपये देणार आहोत. एकेकाळी लोकसंख्या नियंत्रणाच्या उपायांचे समर्थन करणारे मुख्यमंत्री नायडू आता मात्र बदललेल्या भूमिकेत दिसत आहेत. जन्मदर वाढवण्यासाठी आता समाजाने एकत्र येऊन काम करण्याची वेळ आली आहे, असे त्यांनी म्हटले आहे. नायडू यांची ही घोषणा त्यांच्या आधीच्या एका प्रस्तावानंतर आली आहे, ज्यामध्ये त्यांनी दुसऱ्या अपत्याच्या जन्मासाठी २५,००० रुपयांचे प्रोत्साहन देण्याचे सुचवले होते. ५ मार्च रोजी त्यांनी विधानसभेत माहिती दिली होती की, राज्य सरकार दुसऱ्या अपत्यासाठी २५,००० रुपयांचा भत्ता देण्याचा विचार करत आहे. नायडू यांच्या मते, बदलत्या सामाजिक आणि आर्थिक प्रवाहांमुळे कुटुंबाचा आकार लहान होत चालला आहे. उत्पन्न वाढल्यामुळे काही जोडपे ◀◀ पान २ वर

# अमूल पाठोपाठ गोकुळ दूध दरात २ रुपयांची वाढ

कोल्हापूर । प्रतिनिधी

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाने (गोकुळ) गाय दुधाच्या विक्री दरामध्ये प्रतिलिटर २ रुपयांची वाढ केली आहे. ही दरवाढ २१ मे २०२६ पासून सर्व शहरांत लागू होईल. केवळ गाय दूध विक्री दरात वाढ केली असून, म्हैस दुधाच्या विक्री दरामध्ये कोणतीही वाढ केलेली नाही, असे गोकुळ दूध संघाकडून सांगण्यात आले आहे.

याआधी देशातील सर्वांत मोठ्या अमूल आणि मदर डेअरी या दूध उत्पादन कंपन्यांनी दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपयांची वाढ केली आहे. आता गोकुळ दूध संघानेही दूध विक्री दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. इंधनाचा वाढता दर, कच्च्या मालाच्या किंमती तसेच वाहतूक, पॅकेजिंग आणि इतर खर्चात सातत्याने होत असलेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर गोकुळ दूध संघाने गाय दुधाच्या विक्री दरामध्ये ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### सीबीएसइकडून ९ वी १० वीसाठी तीन भाषा अनिवार्य

नवी दिल्लीः केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसइ) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून इयत्ता ९ वी आणि १० वीच्या भाषा धोरणामध्ये मोठे बदल जाहीर केले आहेत. १५ मे २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकात बोर्डाने म्हटले आहे की, ही सुधारित रचना राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि शालेय शिक्षणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २०२३ च्या धर्तीवर तयार करण्यात आली आहे. अधिसूचनेनुसार, १ जुलै २०२६ पासून इयत्ता ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषांचा अभ्यास करणे अनिवार्य होईल. या तीन भाषांपैकी किमान दोन भाषा या मूळ भारतीय भाषा असणे आवश्यक आहे, असेही बोर्डाने स्पष्ट केले आहे.

### तामिळनाडूत मंत्रिमंडळ खातेवाटप जाहीर

चेन्नई : तामिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी आपल्या पहिल्याच सरकारमध्ये गृह, सामान्य प्रशासन, महिला व युवक कल्याण यांसह अनेक महत्त्वाची खाती स्वतःकडे ठेवली आहेत. तर ज्येष्ठ नेते के. ए. सेंगोत्तैयन यांच्याकडे अर्थमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. राजभवनाने शनिवारी मुख्यमंत्री विजय यांच्या शिफारसीनुसार १० मंत्र्यांच्या खातेवाटपास मंजुरी दिली. मुख्यमंत्री विजय यांच्याकडे सामान्य प्रशासन, गृह, महिला व युवक कल्याण, बालक, ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग कल्याण, महानगर प्रशासन तसेच शहरी व पाणीपुरवठा ही खाती राहणार आहेत. मंत्री एन. आनंद यांच्याकडे ग्रामविकास व जलसंपदा, तर आधव अर्जुना यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम, महामार्ग, लघु बंदरे आणि क्रीडा विकास खात्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. डॉ. के. जी. अरुणराज यांच्याकडे आरोग्य, वैद्यकीय शिक्षण आणि कुटुंब कल्याण विभाग सोपविण्यात आला आहे.

### केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना तात्काळ बडतर्फ करा-गांधी

दिल्लीः पेपरफुटीमुळे २२ लाख विद्यार्थ्यांचा विश्वासघात झाला आहे. या प्रकरणी शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना तात्काळ पदावरून बडतर्फ करा किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः या प्रकरणाची जबाबदारी घ्यावी, असे आवाहन लोकसभा विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी केले आहे. पेपरफुटी प्रकरणी केलेल्या एक्स पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, २२ लाख विद्यार्थ्यांनी नीट परीक्षेच्या तयारीसाठी दोन वर्षे रात्रंदिवस मेहनत केली होती, मात्र त्यांची ही मेहनत वाया गेली आहे. परीक्षा सुरू होण्याच्या दोन दिवस आधीच निटचा पेपर व्हॉट्सअॅपवर वाटण्यात आला होता, हे संपूर्ण देशाला माहीत आहे, असा आरोप त्यांनी केला. शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान या वादाची जबाबदारी घेण्यास नकार देत असल्याचा आरोपही राहुल गांधी यांनी केला आहे.

### पेपरफुटी प्रकरणात एनटीएची शिक्षिका अटकेत

नवी दिल्ली : देशभरात खळबळ उडवणाऱ्या निट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण ब्यूरोने आणखी एक मोठी कारवाई करत नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ची एक्सपर्ट शिक्षिका मनीषा गुरुनाथ मानधरे हिला दिल्लीतून अटक केली आहे. मनीषा मानधरे ही पुण्यातील वरिष्ठ बॉटनी शिक्षिका असून, तिनेच जीवशास्त्राचा पेपर फुटविल्याचा गंभीर आरोप सीबीआयने केला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.१५ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४५.०० क्विंटल | २,०४१ | ३,१५१ | २,३७० |
| ज्वारी/हायब्रिड :१५८.५० क्विंटल | १,९०० | ५,१५२ | २,५६८ |
| मका/लोकल: १७.५० क्विंटल | १,८२५ | १,८२५ | १,८२५ |
| तूर : १७.०० क्विंटल | ६,८०० | ७,४०० | ७,१९२ |
| उडीद : ३.५० क्विंटल | ५,५०१ | ६,१०० | ५,८६७ |
| बाजरी: ५९.०० क्विंटल | १,९०० | २,४०१ | २,२१२ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,०७५ | ५,१०० | ५,०८७ |

cmyk

## अग्रलेख

# इंधन दरवाढीचा भडका; काटकसरीच्या दिखाव्यात होरपळणारी जनता

अखेर पेट्रोल-डिझेल दरवाढीची भीती खरी ठरली. गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत होत्या. अमेरिका-इराण संघर्षामुळे पश्चिम आशियातील तणाव आणखी वाढला आणि त्याचा थेट परिणाम भारतासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांवर झाला. भारताच्या इंधन गरजेपैकी तब्बल ८५ टक्क्यांहून अधिक गरज आयातीवर अवलंबून आहे. त्यामुळे जागतिक बाजारपेठेतील किंचित हालचालही भारतीय अर्थव्यवस्थेच्या नसानसांत जाणवते. आता केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलच्या दरात प्रत्येकी तीन रुपयांची वाढ करताच महागाईचे नवे चक्र सुरू होण्याची चिन्हे स्पष्ट झाली आहेत. सीएनजीच्या दरातही वाढ झाल्याने सर्वसामान्य माणसाच्या जगण्याचा खर्च आणखी वाढणार आहे.

इंधन दरवाढ म्हणजे केवळ वाहनधारकांचा प्रश्न नसतो. पेट्रोल-डिझेल महागले की वाहतूक खर्च वाढतो. वाहतूक खर्च वाढला की अन्नधान्य, भाजीपाला, दूध, बांधकाम साहित्य, औद्योगिक उत्पादने अशा प्रत्येक वस्तूंच्या किमती वाढतात. महागाईचे चटके सामान्य माणसाला बसतात, पण त्याचा परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. आधीच बेरोजगारी, कमी उत्पन्न आणि वाढत्या खर्चामुळे मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबे आर्थिक ताणाखाली आहेत. त्यात ही इंधन दरवाढ म्हणजे जखमेवर मीठ चोळण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे.ङ्गसरकारचे म्हणणे असे की तेल कंपन्यांना प्रचंड तोटा सहन करावा लागत होता. कच्चे तेल ६९ डॉलर प्रति बॅरलवरून थेट ११४ डॉलरच्या आसपास पोहोचल्याने इंडियन ऑईल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्थान पेट्रोलियम या कंपन्यांना दररोज हजारो कोटी रुपयांचे नुकसान होत होते. हे नुकसान भरून काढण्यासाठी दरवाढ अपरिहार्य होती, असे सरकारचे स्पष्टीकरण आहे. पण हा युक्तिवाद पूर्णपणे जनतेला पटणारा नाही. कारण जेव्हा कच्च्या तेलाचे भाव कमी होतात, तेव्हा त्याचा लाभ ग्राहकांना कितपत दिला जातो हा प्रश्न कायम उपस्थित राहतो. याच काळात सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी विक्रमी नफा कमावल्याची आकडेवारी समोर आली आहे. हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीत तब्बल ७८ टक्क्यांची नफावाढ नोंदवली. कंपनीचा निव्वळ नफा सहा हजार कोटी रुपयांवर गेला. वार्षिक नफा अठरा हजार कोटी रुपयांच्या पुढे पोहोचला. भागधारकांसाठी आकर्षक लाभांश जाहीर करण्यात आला. मग प्रश्न असा निर्माण होतो की, कंपन्या तोट्यात असल्याचा दावा आणि दुसरीकडे विक्रमी नफा, या दोन्ही गोष्टी एकाच वेळी कशा काय शक्य आहेत? तेल कंपन्यांचा नफा वाढण्यामागे 'रिफायनिंग मार्जिन' आणि वाढीव किरकोळ दर ही दोन प्रमुख कारणे असल्याचे सांगितले जाते. पण सामान्य नागरिकाला त्यातील तांत्रिक बाबींशी काही देणेघेणे नसते. त्याला एवढेच दिसते की त्याच्या खिशावरचा भार वाढत आहे आणि सरकार मात्र कंपन्यांच्या नफ्याचे समर्थन करत आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांचा नफा वाढणे अर्थव्यवस्थेसाठी चांगले असू शकते, पण जनतेच्या अडचणींकडे दुर्लक्ष करून हा नफा कमावला जात असेल तर त्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे. दरवाढीनंतर सरकारने इंधन बचतीचे आवाहन सुरू केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना 'वर्क फ्रॉम होम'चा पर्याय स्वीकारण्याचे आवाहन केले. दिल्ली सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना आठवड्यातून दोन दिवस घरून काम करण्याची मुभा दिली. महाराष्ट्रातही मंत्र्यांनी इंधन बचतीच्या प्रतीकात्मक मोहिमा सुरू केल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुलेट मोटारसायकलवरून विधान भवनात जाण्याचा निर्णय घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे इलेक्ट्रिक वाहनातून प्रवास करताना दिसले. काही मंत्री पायी चालत मंत्रालयात पोहोचले. सरकारच्या मते हा जनजागृतीचा प्रयत्न आहे; मात्र जनतेच्या दृष्टीने हा केवळ दिखावा ठरत आहे. कारण प्रत्यक्ष वास्तव वेगळेच आहे. मुख्यमंत्री मोटारसायकलवरून गेले, पण त्यांच्या सुरक्षेसाठी अनेक वाहनांचा ताफा मागे होता. काही मंत्री सार्वजनिक काटकसरीचे संदेश देत असतानाच चार्टर्ड विमानातून प्रवास करत असल्याचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यामुळे जनतेत सरकारच्या प्रामाणिकपणाबाबत संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. काटकसरीचे संदेश सामान्य जनतेसाठी आणि ऐषआरामी सुविधा सत्ताधाऱ्यांसाठी, अशी भावना निर्माण झाली तर त्याचे गंभीर राजकीय परिणाम होऊ शकतात.ङ्गशरद पवार, रोहित पवार यांसारख्या विरोधी नेत्यांनी याच मुद्द्यावर सरकारवर जोरदार टीका केली आहे. 'इंधन बचत' ही केवळ कॅमेऱ्यासमोरची कृती नसून ती प्रशासनाच्या प्रत्येक स्तरावर प्रत्यक्षात उतरली पाहिजे, असा त्यांचा मुद्दा आहे. सरकारने ताफे कमी करण्याचे, दौरे मर्यादित ठेवण्याचे, विशेष विमानांचा वापर टाळण्याचे आदेश दिले असले तरी त्याची काटेकोर अंमलबजावणी झाली तरच त्याला अर्थ आहे. अन्यथा हे सर्व उपक्रम जनतेच्या संतापाला अधिक खतपाणी घालतील.

खरे तर भारतासमोर ऊर्जा सुरक्षेचे मोठे आव्हान उभे आहे. तेल आयातीवरील अवलंबित्व कमी करणे, पर्यायी ऊर्जा स्रोत वाढवणे, सार्वजनिक वाहतूक सक्षम करणे आणि इलेक्ट्रिक वाहनांसाठी भक्कम पायाभूत सुविधा निर्माण करणे, या दिशेने दीर्घकालीन धोरण आवश्यक आहे. फक्त दरवाढ करून आणि काटकसरीचे आवाहन करून समस्या सुटणार नाही. सामान्य माणसाच्या खिशावरचा भार कमी करण्यासाठी कररचनेत बदल, इंधनावरील करात कपात आणि सार्वजनिक वाहतुकीत गुंतवणूक यासारखे निर्णय घ्यावे लागतील. आज परिस्थिती अशी आहे की, एका बाजूला सरकार जनकल्याणाच्या घोषणा करत आहे, तर दुसऱ्या बाजूला वाढत्या महागाईने सामान्य माणूस अक्षरशः हैराण झाला आहे. इंधन दरवाढीचा परिणाम येत्या काही महिन्यांत प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात, बाजारपेठेत आणि उद्योगधंद्यांत दिसून येईल. सरकारने जर वेळेत ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर महागाईचे हे आक्राळ-विक्राळ संकट केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक आणि राजकीय असंतोषालाही कारणीभूत ठरू शकते. जनता सध्या केवळ एकच प्रश्न विचारत आहे  काटकसर नेमकी कोणासाठी आणि त्याग नेमका कोणाचा?

# कार्यकर्त्यांच्या मेहनतीमुळे भाजपा जगातील नंबर वन पक्ष-रावसाहेब पाटील दानवे

**जालना । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टीच्या ''पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियान'' २०२६ अंतर्गत भाजपा जालना महानगर व जालना ग्रामीण जिल्ह्याच्या निवासी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन दि. १६ मे २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील ग्रीन व्हॅली रिसॉर्ट येथे करण्यात आले होते.**

या निवासी प्रशिक्षण वर्गाचे उदघाटन भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्रजी चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे, खा.रामराव वडकुते, डॉ.भागवत कराड, आ.बबनराव लोणीकर, प्रदेश महामंत्री सुनील राणे, जालना ग्रामीण जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे, आ.संतोष पाटील दानवे, माजी आ.कैलासजी गोरंटयाल, विलास बापू खरात, संजय केनेकर, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, किशोर शितोळे, महापौर वंदना मगरे, उपमहापौर राजेश राऊत, सुरेश केसापुरकर, विलास आण्णा दहिभाते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष आ.रविंद्र चव्हाण म्हणाले की, भारतीय जनता पार्टी ही विचारधारेवर चालणारी पक्षसंघटना असून प्रत्येक कार्यकर्ता प्रशिक्षित व पक्षनिष्ठ असणे आवश्यक आहे. बूथस्तरावर कार्यकर्त्यांनी पक्ष वाढीसाठी सातत्याने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. भाजपाच्या वाढत्या संघटनशक्तीचा उल्लेख करताना त्यांनी ''भाजपा हा आता हत्तीप्रमाणे मजबूत पक्ष झाला असून तो ज्या मार्गाने चालतो, त्या मार्गावर इतरांना जागा द्यावी लागते,'' असे प्रतिपादन केले. आज भाजपा हा देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठा पक्ष बनला असून विविध निवडणुकांमध्ये भाजपाला मिळणारे यश हे कार्यकर्त्यांच्या मेहनतीचे फलित असल्याचे त्यांनी सांगितले. लोकप्रतिनिधी म्हणून मिळालेली ओळख ही पक्षामुळेच असल्याचे नमूद करताना रविंद्र चव्हाण म्हणाले की, ''आपली ओळख ही व्यक्ती म्हणून नसून भारतीय जनता पार्टीमुळे आहे.'' प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या घरावर, वाहनावर कमळ चिन्ह लावावे तसेच सर्वसामान्य नागरिकांना पक्षाशी जोडण्याचे काम करावे, असेही त्यांनी सांगितले. मन की बात कार्यक्रम प्रत्येक बूथवर नियमित आयोजित करण्याचे आवाहन करत त्यांनी निवडणुकांमध्ये शंभर टक्के मतदानासाठी कार्यकर्त्यांनी प्रयत्न करावे, महिन्यातील शेवटचा रविवार हा पक्षकार्याला द्यावा तसेच एसआयआरसाठी पदाधिकाऱ्यांनी गतिमान पद्धतीने काम करावे, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देश व महाराष्ट्र अधिक सक्षम करण्यासाठी भाजपाच्या प्रत्येक पदाधिकाऱ्याने बूथस्तरावर सक्रियपणे काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले असेही ते म्हणाले. प्रशिक्षण वर्गाच्या उदघाटन सत्रात माजी मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी मार्गदर्शन करताना संघटन मजबुती, बूथस्तरावरील कामकाज आणि आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. तसेच पक्षाचा इतिहास व विकास या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी विविध विषयांवर विचार मांडले यामध्ये कार्यकर्ता विकास, सांभाळ आणि दायित्व बोध, देशापुढील आव्हाने आणि त्यावरील उपाययोजना, स्थायी कार्यक्रम, बूथ व्यवस्थापन, 'मन की बात व आयटी विभागाच्या कार्यपद्धती, पक्षाची कार्यपद्धती, विचार परिवारावर, वैचारिक अधिष्ठान, प्रत्यक्ष कार्यानुभव, मोदी सरकारच्या गरीब कल्याणकारी योजना व शेवटी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. या निवासी प्रशिक्षण वर्गामुळे कार्यकर्त्यांना संवाद साधण्याची, वैचारिक देवाणघेवाण करण्याची तसेच पक्ष संघटना अधिक बळकट करण्याची संधी मिळाली. यावेळी भाजपा जिल्हा पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष, नगरसेवक, मोर्चे व आघाड्यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.





**आज मराठा संघर्ष यौदधा मनोजदादा जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषणाला बसण्यासाठी सर्व मराठा सेवकांनची बैठक अंतरवाली सराटी येथे आयोजित करण्यात आली होती या बैठकीला शिवसेना जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर,प्रा. विजयजी पवार सर , मराठा सेवक प्रा. पाटील सर यांनी उपस्थित राहुन पाटलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले.यावेळी ३०/५/२०२६  पुर्वी विविध मागण्या शासनाने मंजूर न  केल्यास आमरण उपोषण करण्याचे ठरविण्यात आले. बैठकीला महाराष्ट्रातून मराठा सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाच्या अंमलबजावणीसाठी अण्णाभाऊ साठे चौकात साखळी उपोषण सुरु

**अंबड । प्रतिनिधी**

**अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करण्याच्या मागणीसाठी मातंग समाजातील युवा कार्यकर्ते अरविंद शिरगुळे यांच्यासह चार ते पाच व्यक्तीने लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याजवळ दि. २ मे पासून बेमुदत साखळी उपोषण सुरुवात केले आहे.**



यासंदर्भात तहसीलदार विजय चव्हाण यांना निवेदन देण्यात आले असून, सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाबाबत शासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे. या साखळी उपोषणाला १३ दिवस उलटुनही एकाही अधिकाऱ्याने अथवा लोकप्रतिनिधीने आंदोलनस्थळी भेट दिलेली नाही. दि. १३ मे रोजी झालेल्या पावसामुळे उपोषणकर्त्याची तब्येत खालावत चालली आहे. त्यामुळे मातंग समाजातील कार्यकर्त्यांनी तीव्र रोष व्यक्त केला आहे. जोपर्यंत मातंग समाजाच्या मागण्या पूर्ण होत नाहीत तोपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, अशी ठाम भूमिका व्यक्त करतांनाच उपोषणकर्ते अरविंद शिरगुळे यांनी सरकारकडून मातंग समाजाला न्याय मिळेल का, असा सवाल उपस्थित केला आहे. दरम्यान, या उपोषणाला मातंग समाजातील विविध ठिकाणचे कार्यकर्ते भेट देवून पाठिंबा व्यक्त करीत आहेत. प्रमुख प्रलंबित मागण्या आरक्षण उपवर्गीकरण: सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे अनुसूचित जातीचे 'अ ब क ड' उपवर्गीकरण तात्काळ लागू करा. स्मारक आणि नावे: मुंबई विद्यापीठाला डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नाव द्या आणि अंबड तालुक्यात स्मारकासाठी ५ एकर जागा द्या. नागरी सुविधा: बेघरांना हक्काची घरे द्या आणि फुलेनगर, सुरंगे नगर भागातील रहिवाशांना पीआर कार्डांचे वाटप करा.   या आंदोलनात  चंद्रकांत कारके,भारत जाधव,मंगेश कारके,  आकाश खुडे, अभिजित शिरगुळे यांच्यासह सकल मातंग समाज मोठ्या ताकदीने उभा आहे.

# शनी अमावस्या निमित्त लाखो भाविकांनी घेतले शनि महाराजांचे दर्शन

## श्रीक्षेत्र राक्षसभुवन;शनि महाराजांच्या जयघोषाने परीसर दणदणला

गेवराई । प्रतिनिधी

भारतातील साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असलेल्या श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील शनि महाराज देवस्थानाचे विशेष महत्त्व असुन ते प्रसिध्द देवस्थान आहे. तर शानिवार दि.१६ मे रोजी शनी अमावास्या निमित्त याठिकाणी राज्यासह परराज्यातून भाविकांनी शुक्रवारी मध्यरात्री पासुनच  शनी महाराजांच्या दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी शनि महाराज कि जय अश्या जोरदार घोषणांनी परीसर दणाणून गेला होता.

गेवराई तालुक्यातील श्री क्षेत्र राक्षसभुवन येथे शनीच्या साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असून शनिवारी शनि अमावास्या निमित्त शनी महाराजांच्या दर्शनासाठी हजारोच्या भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी शनीभक्तांनी शिस्तबद्ध पध्दतीने रांगेत उभा राहून दर्शन घेतले. तसेच यावेळी बीड, गेवराई, चकलंबा, उमापुर सह तलवाडा येथील पोलिस ठाण्याच्या वतीने पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच देवस्थानच्या वतीने भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले होते. यामध्ये भाविकांना शिस्तीत दर्शन घेता यावे यासाठी दर्शन रांगेचे नियोजन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच वाहनांसाठी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती.

भारतातील साडे तिन पिठापैकी एक मुख्य पिठ असलेल्या श्रीक्षेत्र राक्षसभूवन येथे शनि अमावस्या निमित्ताने भाविकांनी शनि महाराजांच्या दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी होती. लाखो भाविकांनी शनि महाराजांचे दर्शन घेतले आहे. तसेच या ठिकाणी पानफुल, नारळ, तेल , सुप्रसिद्ध पेढे व रेवडी सह खाऊवाल्यांचे दुकाने मोठ्या प्रमाणात थाटण्यात आले होते. तर शनी अमावस्या निमित रूद्र अभीषेक , शनि शांति ,शनिजप ,नवगृह जप तसेच अभिषेक करण्यासाठी भाविकांनी मंदीरात मोठी गर्दी होती.

**– ओंकार अशोकराव पाठक**
**श्रीक्षेत्र शनि महाराज देवस्थान, राक्षसभुवन**

# तलावात पुढील पलटल्याने दोन मुलींचा मृत्यू

धारूर । प्रतिनिधी

हिंगणी येथील मासेमारी व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातील पलक शामराव पारवे, दिव्या विकास कांबळे, मोहिनी भीमराव पारवे, तन्वी कोंडीराम पारवे आणि जानवी कोंडीराम पारवे या पाच मुली शनिवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास तलावावर पोहण्यासाठी गेल्या होत्या.

तलावाच्या काठावर असलेल्या मासेमारीच्या होडीत पलक, दिव्या आणि मोहिनी या तिघी बसल्या. होडी काही अंतर आत गेल्यानंतर अचानक संतुलन बिघडून ती उलटली. त्यामुळे तिन्ही मुली पाण्यात पडून बुडू लागल्या. मोहिनीला पोहता येत असल्याने ती स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न करत होती. मात्र पलक आणि दिव्या यांनी तिला पकडल्याने तिघीही पाण्यात बुडाल्या. तलावाच्या काठावर असलेल्या इतर मुलींनी आरडाओरडा केल्यानंतर स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि तिघींनाही पाण्यातून बाहेर काढले. या घटनेत मोहिनीला शुद्ध आली. मात्र पलक शामराव पारवे (वय १४, रा. हिंगणी) आणि दिव्या विकास कांबळे (रा. कासारवाडी, ता. परळी) यांना उपचारासाठी अंबाजोगाई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी तपासणीनंतर दोघींनाही मृत घोषित केले.

# पान १ वरून...

## खरीप हंगामासाठी कृषि

त्याचा फोटो व्हॉट्सअॅप किंवा ई-मेलवर पाठविल्यास तक्रारींचे निराकरण अधिक सुलभ होणार असल्याचेही सांगण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांना व्हॉट्सअॅपचा वापर करणे शक्य नाही, त्यांनी दिलेल्या क्रमांकावर संपर्क साधून तोंडी तक्रारी नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या सुविधेसाठी एक भ्रमणध्वनी क्रमांक, एक टोल फ्री क्रमांक आणि एक ई-मेल सेवा तक्रार निवारणासाठी समर्पित करण्यात आली असून, सकाळी ६ ते रात्री १० या वेळेत तक्रारी नोंदविता येणार आहेत. खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण भासू नये, यासाठी कृषि विभागाने ही यंत्रणा अधिक सक्रिय केली आहे.

-------------

## ...तर अध्यक्षपादाचा

आपल्या या मागणीसाठी आक्रमक झाल्याचे देखील बघायला मिळाले आहेत. यावेळी त्यांनी मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावरही जोरदार टीका केली. यावर मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठं वक्तव्य केले आहे. मी पदाला चिकटून बसणाऱ्यांपैकी नाही. उपसमितीच्या अध्यक्षपदाचा माझा राजीनामा दिल्याने मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचे समाधान होत असेल, तर मी राजीनामा द्यायलाही तयार आहे, असे वक्तव्य राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे.

----------

## मनोज जरांगेंचे ३० मे पासून

मंत्र्यांकडून एका संघटनेला दोन कोटी रुपये दिले, असा गंभीर आरोप त्यांनी केला. ३० तारखेला सरकारला गुडघ्यावर आणणार आहे. ३ कोटींहून अधिक मराठे आंदोलनात सहभागी होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ३० मे रोजी सर्व मराठ्यांनी रजा टाकावी, असे आवाहन जरागेंनी केले आहे.

---------------

## २० मे रोजी देशभरातील मेडिकल

केमिस्ट संघटनांच्या म्हणण्यानुसार, ई-फार्मसी प्लॅटफॉर्मवर प्रिस्क्रिप्शनची योग्य तपासणी केली जात नाही. एआयच्या मदतीने बनावट प्रिस्क्रिप्शन तयार करून अँटिबायोटिक्स, ऑपिऑइड्स, व्यसनाधीन करणारी औषधे आणि काही बंदी असलेली औषधेही विकली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर मोठ्या प्रमाणात डिस्काउंट देऊन ग्राहकांना आकर्षित केले जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. काही प्रकरणांमध्ये एक्सपायरीच्या जवळ आलेली औषधे विकली जात असल्याचाही आरोप आहे. यामुळे रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो, तसेच अँटिमायक्रोबियल रेझिस्टन्स वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. बीपी, शुगर, थायरॉइड, हृदयविकार यांसारख्या नियमित औषधांवर अवलंबून असलेल्या रुग्णांनी १९ मेपूर्वी आवश्यक औषधांचा साठा करून ठेवावा, असा सल्ला संघटनांकडून देण्यात आला आहे.

**कोविड काळातील नियमांवरही आक्षेप**

संघटनेच्या मते, कोविड काळात लागू करण्यात आलेले जिएसआर २२० (इ) आणि जिएसआर ८१७ (इ) हे तात्पुरते नियम अजूनही सुरू असल्याने ऑनलाइन औषध विक्री कंपन्यांना फायदा होत आहे. दुसरीकडे, पारंपरिक मेडिकल दुकानदारांना मोठे नुकसान सहन करावे लागत असल्याचा दावा करण्यात येत आहे. मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांकडून दिल्या जाणाऱ्या डीप डिस्काउंटिंगमुळे ग्रामीण आणि छोट्या भागातील मेडिकल दुकाने बंद पडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे सुमारे ५ कोटी लोकांच्या रोजगारावर परिणाम होऊ शकतो, असा दावा संघटनांनी केला आहे.

-----------

## नीट पेपरफुटीतील आरोपी

शिक्षण बीडमध्येच झाले. त्याचे वडिलही शिक्षक म्हणून बीडमध्येच कार्यरत होते. पी. व्ही. कुलकर्णी यांचे राहते घर एका खासगी बिल्डरकडून बांधले जात आहे. त्याच ठिकाणी कुलकर्णीचे नवे घरही होत आहे. काही शेत जमीन पाटोदा तालुक्यातही असल्याचे बोलले जात आहे. प्रा. कुलकर्णीची बीडमध्ये नेहमीच ये-जा असायची. काही खासगी क्लासेस चालकांसोबत मैत्रीचेही संबंध होते. या मैत्रीच्या संबंधातूनच नीट पेपरफुटीचे कनेक्शन बीडपर्यंत पोहचलेले असावे असा संशय व्यक्त होत असतानाच अनेक निनावी तक्रारी बीडमधून दाखल झाल्या आहेत. आलेल्या तक्रारीची क्रॉस चेकींग संबंधित यंत्रणेकडून केली जात आहे.

-------------

## भाजपच्या गंभीर आरोपांनंतर कॉंग्रेसकडून

भाजपने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म वर केलेल्या पोस्टसमध्ये म्हटले आहे की, राहुल गांधी यांनी लंडन, न्यूयॉर्क, इटली, जर्मनी, कतार, व्हिएतनाम, कंबोडिया, मालदीव आणि दुबई यासह एकूण ५४ परदेश दौरे केले आहेत. तसेच यामध्ये त्यांच्या एका गुप्त ओमान दौऱ्याचा देखील समावेश आहे. या दौऱ्यांचा एकूण अंदाजित खर्च सुमारे ६० कोटी रुपये आहे. यामध्ये फर्स्ट क्लासचे तिकीट, खासगी विमाने (चार्टर फ्लाईट्स), पंचतारांकित हॉटेल्स, त्यांच्यासोबत असणाऱ्या लवाजम्याचा खर्च आणि सुरक्षा व्यवस्थेचा समावेश आहे. भाजपने पुढे दावा केला आहे की, राहुल गांधी यांनी गेल्या दशकात आपले एकूण उत्पन्न सुमारे ११ कोटी रुपये असल्याचे जाहीर केले होते. मात्र, २०१५ मधील त्यांच्या दौऱ्याचा खर्च जाहीर उत्पन्नापेक्षा ५.२ पटीने अधिक होता. या जगभ्रमंतीचा खर्च नेमका कोणी केला? असा सवाल भाजपने राहुल गांधींना विचारला आहे. भाजपने राहुल गांधींच्या परदेश दौऱ्यांसाठी पैसा कुठून आला, असा प्रश्न विचारत परदेशी अंशदान नियमन कायद्याचे आणि प्राप्तिकर कायद्यांचे उल्लंघन झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. या आरोपानंतर आता कॉंग्रेसने भाजपचे हे सर्व आरोप राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे सांगत फेटाळून लावले आहेत. तसेच कॉंग्रेसने पंतप्रधान मोदींचा एक एआय-जनरेटेड व्हिडिओ शेअर करत त्यांच्या परदेश दौऱ्यांच्या खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कॉंग्रेस नेते जयराम रमेश म्हणाले की, देशसमोरील आर्थिक आणि परराष्ट्र धोरणाच्या मुख्य मुद्द्यांवरून जनतेचे लक्ष भरकटवण्यासाठी भाजप हे प्रयत्न करत आहे. कॉंग्रेस नेते माणिकम टागोर यांनी भाजपवर आरोप केला की, भाजप देशामधील बेरोजगारी, महागाई आणि सीमावादासारख्या महत्त्वाच्या प्रश्नांवर बोलण्याऐवजी केवळ चिखलफेक करण्याची मोहीम राबवत आहे.

-------------

## 'तरुणांना झुरळ

व्यवस्थेवर टीका करतात, असे त्यांनी म्हटल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र, शनिवारी  सूर्यकांत यांनी याबाबत भूमिका स्पष्ट करत माध्यमांवर वक्तव्याचा चुकीचा संदर्भ दिल्याचा आरोप केला. माझ्या तोंडी निरीक्षणांचा चुकीचा अर्थ लावला गेला, हे पाहून मला वेदना होत आहेत, असे त्यांनी म्हटले. त्यांनी स्पष्ट केले की, त्यांची टीका बेरोजगार तरुणांवर नव्हती, तर बनावट पदव्या घेऊन वकिली व्यवसायात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींवर होती. मी विशेषतः अशा लोकांवर टीका केली होती, जे खोट्या आणि बनावट पदव्यांच्या आधारे वकिलीसारख्या क्षेत्रात आले आहेत. अशाच प्रकारचे काही लोक मीडिया, सोशल मीडिया आणि इतर सन्माननीय क्षेत्रांतही शिरले आहेत. त्यामुळे मी त्यांना परजीवी) म्हटले, असें त्यांनी स्पष्ट केले. शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयातील दोन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर एका वकिलाने वरिष्ठ वकील दर्जासाठी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. या वेळी न्यायालयाने संबंधित वकिलाच्या वर्तनावर तीव्र नाराजी व्यक्त केली होती. खंडपीठाने संबंधित वकिलाला फटकारताना, वरिष्ठ वकील दर्जा हा पाठपुरावा करून मिळवण्याचा विषय नसल्याचे सांगितले. सुनावणीदरम्यान त्या वकिलाच्या फेसबुक पोस्टमधील भाषेचाही उल्लेख करण्यात आला. याच चर्चेदरम्यान सूर्यकांत यांनी समाजात व्यवस्थेवर सतत टीका करणाऱ्या काही लोकांचा उल्लेख करत वक्तव्य केले होते. याच वक्तव्याचा काही भाग सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला आणि त्यावरून वाद निर्माण झाला. दरम्यान, सूर्यकांत यांनी भारतातील तरुणांबद्दल आदर व्यक्त करत, देशाचे तरुण हे विकसित भारताचे आधारस्तंभ आहेत. मला भारताच्या आजच्या आणि उद्याच्या युवा शक्तीचा अभिमान आहे, असेही म्हटले आहे.

---------

## अमूल पाठोपाठ गोकुळ

प्रतिलिटर २ रुपयांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय गोकुळ दूध संघाच्या प्राधिकृत अधिकारी मंडळाच्या मार्गदर्शनाखाली गोकुळ शिरगाव (जि. कोल्हापूर) येथील प्रधान कार्यालयात झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या दरवाढीत गोकुळच्या (गाय दूध, टोन्ड, शक्ती आणि स्टँडर्ड) या दूध प्रकारांचा समावेश आहे. गोकुळ दूध संघाने यापूर्वी २१ फेब्रुवारी २०२६ रोजी दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून म्हैस दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रुपया आणि गाय दूध खरेदी दरात प्रतिलिटर २ रुपयांची वाढ केली होती. त्यावेळी गाय दुधाच्या विक्री दरात कोणतीही वाढ केली नव्हती, असे गोकुळने म्हटले आहे.

-----------

## तिसऱ्या अपत्यासाठी ३० हजार,

एकाच मुलाला प्राधान्य देत आहेत, तर काही जोडपे पहिले अपत्य मुलगा नसेल तरच दुसऱ्या अपत्याचा विचार करतात. लोकसंख्या वाढीचा वेग मंदावत असल्याचे सांगत त्यांनी रिप्लेसमेंट-लेव्हल टोटल फर्टिलिटी रेट २.१ वर राखण्याच्या गरजेवर भर दिला. जेव्हा सरासरी प्रजनन दर प्रति महिला २.१ मुले असतो, तेव्हा लोकसंख्या स्थिर राहते, असे सांगत त्यांनी इशारा दिला की, अनेक देशांमधील घटती लोकसंख्या आणि वयोवृद्ध होत चाललेल्या समाजामुळे तेथील आर्थिक विकासाला फटका बसला आहे.

---------

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

रविवार, दि. १७ मे २०२६



## थोडक्यात

### आजपासून मिलिंद महाराज गोंदीकर यांची श्रीमद् भागवत महाकथा सोहळा

बीड : गेवराई तालुक्यातील चकलांबा येथे रविवार दि. १७ ते २३ मे २०२६ दरम्यान वाणीभूषण मिलिंद महाराज गोंदीकर भागवत कथाकार ह.भ.प. यांच्या सुश्राव्य वाणीतून श्रीमद्? भागवत कथा आयोजित करण्यात आली आहे. दर तीन वर्षांनी येणाऱ्या धोंडयाच्या या पवित्र महिन्यात चकलांबा येथील रोकडेश्वर मंदिर सभागृहात भाविक महिलांनी एकत्रितरित्या श्रीमत भागवत कथा आयोजित केली आहे. कथा पहिल्या दिवशी दुपारी ३.०० वाजता सुरू होणार आहे.



तर सोमवार पासून दररोज कथेची वेळ सकाळी १०.०० ते २.०० वाजेपर्यंत आहे. चकलांबा व परिसरातील भाविकांनी सहकुटुंब भागवत कथा श्रवणाचा लाभ घ्यावा, आहे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले.

भागवत कथा आयोजनासाठी चकलांबा येथील महिला भगिनींनी एकत्रितपणे भागवत कथा सोहळा आयोजित केला आहे. यामध्ये मीरा रामराव खेडकर, सिंधु विनायक आव्हाड- सांगळे, द्वारका प्रल्हाद खेडकर, मीरा गीताराम खेडकर, शोभा नरहरी जायभाये, विजया गोविंद कापसे, शीतल रमेश खेडकर, मंगल रघुनाथ खेडकर, राजश्री विठ्ठल खेडकर, मीना शिवाजी खेडकर, सौ.द्वारका भगवान चौधर, द्रौपदी बंडू खेडकर, मीरा अंबादास खेडकर, विठाबाई रमेश खेडकर, संजाबाई जणाजी फाटक, मुक्ताबाई गवळी, कल्पना गणू खेडकर, संगीता नारायण नागरे आदी भागवतकथा आयोजनासाठी प्रयत्नशील आहेत.

### आठवडी बाजार राज मोहम्मद चौक परिसरातून अन्यत्र हलवण्याची जनतेची आर्त हाक

पाटोदा । प्रतिनिधी

दर गुरुवारी पाटोदा शहरात भरणारा आठवडी बाजार आता केवळ खरेदी-विक्रीचे केंद्र राहिला नसून, तो शहराच्या आरोग्यासाठी आणि वाहतुकीसाठी एक मोठी डोकेदुखी ठरत आहे. अपुरी जागा आणि वाढती गर्दी यामुळे संपूर्ण शहर ठप्प होत असून, हा बाजार शहराबाहेर मोठ्या जागेत स्थलांतरित करावा, अशी संतप्त आणि आग्रही मागणी पाटोद्याच्या जनतेने केली आहे. मुख्य समस्या: राज मोहम्मद चौक पूर्णपणे ठप्पपाटोदा शहराचा विस्तार वाढला आहे, मात्र बाजाराची जागा तीच जुनी आणि मर्यादित आहे. गुरुवारी बाजारच्या दिवशी संपूर्ण पाटोद्यात पाय ठेवायला जागा नसते. राज मोहम्मद चौक हा या कोंडीचा मुख्य केंद्रबिंदू ठरत आहे. रस्त्याच्या दुतर्फा लागणारी दुकाने आणि अस्ताव्यस्त वाहने यामुळे या चौकातील आणि आजूबाजूच्या मार्गावरील वाहतुकीचा पुरता बुरडा उडतो. चौकात थरार: मृत्यूशी झुंजणाऱ्या रुग्णांची कसरतया वाहतूक कोंडीचा सर्वात भयानक फटका रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना बसत आहे. राज मोहम्मद चौकामध्ये तासनतास ट्रॅफिक जाम होत असल्याने आपत्कालीन सेवा कोलमडतात.डिलिव्हरी पेशंटचा जीव टांगणीला: प्रसूती कळा सोसणाऱ्या ग्रामीण भागातील महिलांना घेऊन येणाऱ्या गाड्या या कोंडीत अडकतात. रुग्णालयाचे अंतर अवघ्या पाच मिनिटांचे असताना, तिथपर्यंत पोहोचायला पाऊण तास लागतो.अपघातातील रुग्णांना वेळेची किंमत: अपघातातील गंभीर रुग्णांना बीड किंवा नगरकडे नेणाऱ्या रुग्णवाहिका (अँब्युलन्स) राज मोहम्मद चौकातील गर्दीत सायरन वाजवत जागेवरच उभ्या राहतात. गर्दीतून रस्ता काढताना चालकांची मोठी कसरत होते. वेळेवर उपचार न मिळाल्यास इथे मोठा अनर्थ घडण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. जनतेचा थेट सवाल: आमदार सुरेश धस यांनी तातडीने जागा द्यावी!''आम्हाला बाजार नको असं नाही, पण तो लोकांच्या जिवावर उठणारा नसावा,'' अशी भावना स्थानिक नागरिक व्यक्त करत आहेत. या गंभीर समस्येतून शहराची सुटका करण्यासाठी आता थेट आमदार सुरेश धस यांच्याकडे जनतेने आशेने पाहत मागणी केली आहे.आमदार सुरेश धस यांनी स्वतः लक्ष घालून शहराबाहेर एखादी मोठी, प्रशस्त शासकीय किंवा खाजगी जागा या आठवडी बाजारासाठी उपलब्ध करून द्यावी. तिथे पार्किंग आणि बाजाराची स्वतंत्र व्यवस्था झाल्यास पाटोदा शहराचा श्वास मोकळा होईल. शहराचे नियोजन आणि नागरिकांचा जीव वाचवण्यासाठी लोकप्रतिनिधी आता काय पाऊल उचलतात, याकडे संपूर्ण पाटोदा तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# आज पुरुषोत्तमपुरी येथे जिल्हाधिकारी जॉन्सन व आ.सोळंके यांच्या हस्ते भगवान पुरुषोत्तमाची होणार शासकीय महापूजा

माजलगाव । प्रतिनिधी

आज दि १७ मे रविवार रोजी पासून हिंदू धर्मियात महत्त्वाच्या अशा मानल्या जाणाऱ्या अधिक मासास (धोंड्याचा महिना) प्रारंभ होत असून, यानिमित्त तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथे भगवान विष्णूचा अवतार असलेल्या भगवान पुरुषोत्तम मंदिरात आज दि १७ मे रविवार रोजी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन व आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते महापूजा होणार आहे.

बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात गोदावरी नदीकाठी पुरुषोत्तमपुरी हे ३००० लोकसंख्येचे गाव आहे.येथे नदीकाठापासून अलीकडे तेराव्या शतकात राजा रामदेवराय यांच्या काळात विष्णूचा अवतार भगवान पुरुषोत्तमाचे हेमाडपंथी मंदिर दगडविटांनी बांधलेले होते, सध्या



या मंदिराच्या पुनर्निर्माणाचे काम मागील दोन वर्षांपासून सुरू आहे.येथे काळ्या पाषाणात भगवान पुरुषोत्तमाची उभी मूर्ती,हाती शंख-चक्र-गदा-पद्म धारण केलेली तीन फूट उंचीची आहे. पुरातन काळात या परिसरात दंडकारण्य होते. तेथे शार्दूल नावाचा राक्षस रयतेला त्रास देत असे.भगवान विष्णूने पुरुषोत्तमाचा अवतार धारण करून आपल्या हातातील चक्राने राक्षसाचा वध केला



व ते चक्र गोदावरी नदीत धुऊन काढल्याने या तीर्थाला चक्रतीर्थ असे नाव पडले.धोंडे महात्म्य या पवित्र ग्रंथात उल्लेखलेल्या बारा महिन्यांना बारा भगवंत स्वामी आहेत.मात्र सर्वांचा मिळून बनलेल्या अधिक मासाचे स्वामित्व कोणीच स्वीकारत नसल्याने ते पुरुषोत्तमाने स्वीकारले.त्यामुळे दर



तीन वर्षांनी येणारा अधिक मासात (धोंड्याचा महिना) पुरुषोत्तम दर्शनास महत्त्व आहे.आता हे मंदिर जीर्णोद्धारासाठी पाडलेले आहे.आज दि १७ मे रविवार रोजी पासून संपूर्ण महिनाभर येथे यात्रा भरणार आहे. या महिन्यातच पुरुषोत्तम दर्शनाचे महत्त्व असल्याने त्यासाठी

### महिनाभर लाखो भाविकांची मांदियाळी

देशभरातून लाखोच्या संख्येने भाविक येथे दर्शनासाठी येतात. आज रविवार रोजी सकाळी ९:०० वाजता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आमदार प्रकाश सोळंके यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते भगवान पुरुषोत्तमाची महापूजा करण्यात येणार आहे.

### वाहतुकीची कोंडी होणार

पुरुषोत्तमपुरी येथे पुरातन ठेवा असताना प्रशासनाच्या व राजकीय उदासीनतेमुळे गावास जाण्याचा मार्गही एकेरी व बिकट आहे. डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सात किलोमीटरचा रस्ता तातडीने होण्यासाठी प्रयत्न केले मात्र प्रशासकीय पातळीवर हे काम अद्यापपर्यंत होऊ शकलेले नाही. त्यामुळे अधिक मासात संपूर्ण वाहतुकीची मोठी कोंडी होण्याची भीती आहे.

# सांगलीत वीज कर्मचारी संघटनांचे राज्यव्यापी आंदोलन

## काळ्याफिती लावून काम; बोनस, पेन्शन व खाजगीकरणाविरोधात जोरदार निदर्शने

सांगली । प्रतिनिधक्ष

वीज क्षेत्रातील प्रमुख १७ कामगार संघटनांनी राज्यव्यापी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आज सांगली मंडल कार्यालयासमोर काळ्याफिती लावून काम करत जोरदार निदर्शने केली. विविध मागण्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात जिल्हाभरातील कर्मचारी, पदाधिकारी व सभासद मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या आंदोलनामध्ये दिवाळी सानुग्रह अनुदान तातडीने जाहीर करावे, ९ ऑक्टोबरच्या संपावेळी सिम कार्ड जमा केलेल्या कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई करू नये, ३२९ उपकेंद्रे खाजगी भांडवलदारांकडे चालविण्यास देऊ नयेत तसेच कर्मचाऱ्यांना पेन्शन योजना लागू



करावी या प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

आंदोलनाची सुरुवात जगदीश नलवडे व श्रीकांत धनवडे यांच्या घोषणांनी झाली. त्यानंतर मागासवर्गीय संघटनेचे प्रकाश ठोमके यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर मनोगत व्यक्त केले. संघटनेचे सुहास काळे यांनीही संघटनांच्या एकजुटीवर भर देत प्रशासनाच्या धोरणांवर टीका केली. वर्कर्स फेडरेशनचे झोनल सचिव सुरेश पाटील यांनी आंदोलनाची पार्श्वभूमी स्पष्ट करत कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर मार्गदर्शन केले. राष्ट्रवादी इंटकचे मुरसल साहेब यांनी कृती समितीच्या बैठका व पुढील आंदोलनाच्या नियोजनाची माहिती दिली. वर्कर्स फेडरेशनचे कार्याध्यक्ष कॉ. महेश जोतराव यांनी प्रशासनासोबत झालेल्या बैठकीचा आढावा घेत "रिस्ट्रक्चरिंग पूर्णपणे अपयशी ठरले असून जुन्या पद्धतीने काम केल्यामुळेच मार्च महिन्यात मोठ्या प्रमाणात वसुली झाली," असे नमूद केले. बोनस संदर्भात प्रशासनाने ठोस भूमिका न घेतल्यामुळे संघटनांना आंदोलनाचा निर्णय घ्यावा लागल्याचेही त्यांनी सांगितले.

प्रमोद पोतदार यांच्या घोषणांनी द्वारसभेची सांगता झाली.


या आंदोलनात वर्कर्स फेडरेशनचे उपसरचिटणीस श्रीमंत खरमाटे, विजय पवार, दयानंद खांडेकर, युवराज औंधकर, अवधूत पाटील, संघटनेचे कोरे साहेब, गणेश आवळे, पृथ्वीराज शिंदे, इंटकचे अमर थोरात, राष्ट्रवादी इंटकचे बुजरूक साहेब, मागासवर्गीय संघटनेचे सदामते साहेब यांच्यासह विविध भागांतील कर्मचारी व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांगलीप्रमाणेच इस्लामपूर, विटा आणि कवठेमहांकाळ विभागीय कार्यालयांमध्येही आंदोलन करण्यात आले. आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे व संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

# जीवे मारण्याच्या उद्देशाने प्राणघातक हल्ला गंभीर आरोपातून आरोपींची निर्दोष मुक्तता

**बीड । प्रतिनिधी**

बीड ग्रामीण पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा क्र. १८०/२०२० मधील आरोपींना बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने मोठा दिलासा देत पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली आहे.आरोपींच्या वतीने ॲड.सुभाष काळे, अँड.शेख सद्दाम शेख इस्माईल यांनी काम पाहिले





सदर प्रकरणात आरोपी १)प्रशांत वचिष्ठ नवले २) विशाल लक्ष्मण उर्फ बंडू नवले रा.पाली ता.जिल्हा.बीड व इतर दोन आरोपी यांच्यावर जीवेमारण्याच्या उद्देशाने प्राणघातक हल्ला करून मारहाण केल्याचा गंभीर आरोप ठेवण्यात आला होता. याप्रकरणी भारतीय दंड संहितेच्या () कलम ३०७, ३२४, ५०४, ४२७, १४३, १४७, १४८, १४९, १८८, २६९ आणि २७० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुनावणीदरम्यान फिर्यादी पक्षाकडून सादर करण्यात आलेले पुरावे, साक्षीदारांचे जबाब तसेच वैद्यकीय कागदपत्रांमध्ये विसंगती आढळून आल्याचे न्यायालयाच्या निर्दर्शनास आले. बचाव पक्षाचे वकिल ॲड.सुभाष काळे, अँड.शेख सद्दाम यांनी आरोपी क्र १)प्रशांत वचिष्ठ नवले २) विशाल लक्ष्मण उर्फ बंडू नवले यांना विनाकारण खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आल्याचा युक्तिवाद करत, त्यांच्याविरोधात कोणताही ठोस व विश्वासार्ह पुरावा नसल्याचे न्यायालयासमोर मांडले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि उपलब्ध पुरावे तपासल्यानंतर बीड जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपी क्र १)प्रशांत वचिष्ठ नवले २) विशाल लक्ष्मण उर्फ बंडू नवले रा. पाली ता.जि.बीड. यांना संशयाचा फायदा देत आरोपींची निर्दोष मुक्तता केली.या खटल्यात आरोपींच्या वतीने ॲड. सुभाष काळे यांनी भक्कम बाजू मांडली. त्यांना या कायदेशीर लढाईत ॲड. शेख सद्दाम शेख इस्माईल यांचे मोलाचे सहकार्य लाभले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आरोपी व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले असून, परिसरात निकालाची चर्चा सुरू आहे.

# एकशे वीस कुटूंबांना जीवनावश्यक वस्तुंचे वितरण लोकसहभागातून मानवलोकचा पुढाकार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मानवलोक जनसहयोगच्या वतीने लोकसहभागातून १२० वयोवृद्ध निराधार कुटुंबांना जीवनावश्यक वस्तुचे वितरण करण्यात आले. यावेळी अमित राढंड, ज्ञानोबा कुकडे, मानवलोक परिवाराचे अण्णासाहेब रोहम, भागवत कांबळे, अरूण आसरडोहकर आदी उपस्थित होते.

यावेळी अमित रांदड म्हणाले की, वृद्ध व निराधारांना वयाच्या सरत्या शेवटी धडपड होत नाही त्यांची शेवटी उपासमार होऊ नये ज्यांना आधार नाही त्यांना उदरनिर्वाह भागविण्यासाठी पर्याय नाही तेव्हा मानवलोकच्या



माध्यमातून बाबुजींनी उपक्रम सुरू केला.

ज्ञानोबा कुकडे म्हणाले की,माझ्या वडिलांच्या स्मृती दिनी मी तुमच्या रूपात त्यांना पाहतो खरे तर जीवनावश्यक वस्तु वाटपाची वेळ यावी ही कल्पना करवत नाही पण पुढील पिढीकडून सांभाळ होत नाही म्हणून ही व्यवस्था आहे. मुलांनी आई वडिलांचा सांभाळ करण्याचे आवाहन कुकडे यांनी केले.अण्णासाहेब रोहम यांनी बाबूजींनी निराधार वृद्ध यांच्यासाठी ही योजना सुरू केली त्यामुळेच हे वृद्ध निराधार हाल अपेष्टात न जगता चांगल्या प्रकारचे जीवन जगत असल्याचे सांगितले. शाम सरवदे यांनी संचलन करून आभार मानले कार्यक्रमासाठी संजना आपेट,सावित्री सगरे आदीसह इतरांनी परिश्रम घेतले.

# महाराष्ट्रात नावलौकिक होईल असे वैभवशाली मराठा भवन उभे करू !

## परळीतील मराठा भवन मराठा समाजाची उन्नती,सामाजिक सलोखा व एकतेचे मंदिर ठरेल – आ. धनंजय मुंडे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याला अभिप्रेत अशा प्रकारची सामाजिक एकोप्याची संस्कृती महाराष्ट्राची आहे.परळी शहरात व मतदारसंघात हीच सामाजिक सलोखा व एकतेची ताकद वर्षानुवर्षे आपल्या पाठीशी राहिलेली आहे. जात, धर्म,, पंथ या पलीकडे जाऊन कायमच आपण राजकारणात काम केले आहे. महाराष्ट्रात नावलौकिक होईल अशा प्रकारचे देखणे व वैभवशाली मराठा भवन आपल्या या परळीत आपण उभे करू आणि या माध्यमातून सबंध महाराष्ट्राला सामाजिक एकतेचा संदेश देऊ. या दृष्टीने परळीत उभे राहणारे मराठा भवन हे सामाजिक उन्नती बरोबरच अठरापगड जातीच्या एकतेचे मंदिर ठरेल असा विश्वास माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला.

आ.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठानच्या वतीने मराठा भवन उभारणीसाठी तब्बल २८ गुंठे जागा विकत घेऊन वैद्यनाथ मंदिर च्या परिसरात, अतिशय मुख्य रस्त्यावरील ही जागा हस्तांतरित करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून सकल मराठा समाजाची ही भावना व मागणी लक्षात घेऊन स्वतः लक्ष घालत आ.धनंजय मुंडे यांनी छत्रपती संभाजी महाराज जयंतीच्या औचित्यावर सकल मराठा समाजाला मराठा भवन उभारणीसाठी ही जागा हस्तांतरित केली. मराठवाड्यात तालुकास्तरावर स्वतंत्रपणे उभे राहणारे हे पहिलेच मराठा भवन ठरणार आहे. सकल मराठा समाजाच्या वतीने याबद्दल आ.धनंजय मुंडे यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत. याच अनुषंगाने मराठा युवा मंचच्या वतीने परळी वैजनाथ येथे आज आ.धनंजय मुंडे, नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी आणि या मागणीचा पाठपुरावा करणाऱ्या मराठा सेवकांचा कृतज्ञता समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी मराठा भवन उभारणीसाठी पुढाकार घेतल्याबद्दल मराठा युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष बालासाहेब कडबाने यांच्या वतीने आ. धनंजय मुंडे, नगराध्यक्षा



सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी, मराठा सेवक सेवकराम जाधव, देवराव लुगडे महाराज, नितीन शिंदे, शिवाजी देशमुख ,दिलीप माने त्याचबरोबर ही जागा देणाऱ्या राजेंद्र सोनी तसेच माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकार, नगरपरिषदेचे गटनेते वैजनाथ सोळंके, मराठा समन्वयक प्रा. शंकर कापसे आदींचा हृदय सत्कार करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना आ. धनंजय मुंडे यांनी सांगितले की, एक लोकप्रतिनिधी या नात्याने हे आपले कर्तव्य आहे . आपल्या हृदयापासून मराठा भवन हे मोक्याच्या ठिकाणी आणि अतिशय दर्जेदार व वैभवशाली व्हावे ही आपली कायमच भूमिका होती. नगरपरिषदेच्या अनेक खुल्या जागा या मराठा भवन साठी उपलब्ध होत्या मात्र महाराष्ट्रात नावलौकिक होईल अशा प्रकारचे सामाजिक उत्थनाचे हे मंदिर योग्य जागेवरच उभे राहिले पाहिजे ही आपली भूमिका होती. त्या दृष्टीने वैद्यनाथ मंदिर परिसरातीलच जागा नाथ प्रतिष्ठानच्या वतीने विकत घेतली.या ठिकाणी आता सुसज्ज व वैभवशाली मराठा भवन उभे राहणार आहे. मराठा भवन मध्ये समाज उपयोगी उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुला मुलींचे वसतीगृह, शिकवणी क्लासेस, अभ्यासिका, नोकरी मार्गदर्शन केंद्र आदी विद्यार्थी कलागुण विकसित करण्यासाठीचे उपक्रम या भवन मधून राबवण्यात येणार आहेत. उद्योग, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसायातील बारकावे, येणारी आव्हाने, उद्योजक, व्यावसायिकांचे परिचय मेळावे आदी आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वधू-वर परिचय मेळावे, सामूहिक विवाह कार्य, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक, सामाजिक ,व्यावसायिक यासह अनेक विषयावर प्रबोधन मार्गदर्शन मिळावे आयोजित करण्यासाठी मराठा भवन उपयुक्त ठरणार आहे. सर्व गुणसंपन्न पिढी घडविण्याच्या दृष्टिकोनातून ही वास्तू एक महत्त्वाचे केंद्र ठरणार आहे असे त्यांनी सांगितले. यावेळी पुढे बोलताना आ.मुंडे यांनी सांगितले की, राजकारणात काम करत असताना आपण कधीही जात ,धर्म पंथ याचा लवलेशही लागू दिला नाही. मध्यंतरीच्या काळात हा सामाजिक समतोल बिघडवणाऱ्या काही घटना घडल्या, त्या आडून आपल्याला खलनायक ठरवण्याचा प्रयत्न झाला. मात्र आपण याविषयी कधीही व्यक्त झालो नाही. याचे कारण आपल्याला याची जाणीव आहे की गेल्या अनेक वर्षापासून राजकारणात काम करत असताना १८ पगड जाती समूहाची हीच ताकद मला लढण्याची शक्ती देत आली आहे.

## पान ६ वरुन...

### नांदा फत्तेवडगाव -पिंपरी

वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून या रस्त्याच्या कामामुळे शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. रस्ता रुंद व दर्जेदार झाल्यानंतर प्रवास अधिक सुरक्षित, जलद आणि सुलभ होणार आहे.अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईमुळे रस्ते विकासाच्या कामाला आता कोणताही अडथळा राहणार नसून काम युद्धपातळीवर पूर्ण करण्याचा प्रशासनाचा मानस आहे. सार्वजनिक हिताच्या दृष्टीने प्रशासनाने घेतलेल्या या निर्णायक भूमिकेचे नागरिकांकडून स्वागत केले जात आहे.

### शहरातील जवाहर कॉलनी

पाणी येत नाही,रस्त्याला रस्ता कसं म्हणावं हा प्रश्नच आहे,नाले सफाई वर्षातून दोनदा झाली तरी खूप आहे,जवाहर कॉलनीवासीयांनी कॉलनीच्या ओपन स्पेसवर सावरकरांचा पुतळा का बसवू दिला माहिति नसेल तर सांगतो ! किमान त्यांच्या जयंती आणि पुण्यतिथीला तरी कॉलनीची साफ सफाई होईल पण दुर्दैवाने आज अशी परिस्थिती आहे की,फक्त पुतळ्याच्या पन्नास फूट परिघात स्वच्छता होत आहे. यात कोणत्या राजकीय पक्षाला, विद्यमान अथवा आजी माजी नगरसेवकाला दोष द्यायचा नाही. दोष असेल तर तो आपला सर्वसामान्य नागरिकांचाच आहे. किती निष्क्रियता आहे ही , चांगल्याला चांगलं आणि वाईटाला वाईट म्हणायची देखील हिंमत होत नाही. अशीच वृत्ती कायम राहिली तर आज वर्षातून ३४ दिवस पाणी येतंय उद्या ३ दिवसच येईल. चालू द्या आपल्याला काय करायचं असं म्हणुन कार्यवाही होणार नाही . आगामी काळात किमान ८ दिवसाला पिण्याचे पाणी सोडण्यात यावे अशी विनंती वजा मागणी मुख्याधिकारी नगर परीषद बीड यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आली आहे .

### जिजांसारखा अजातशत्रू

अपघातात आपल्यातून निघून जातो, हे मनाला वेदना देणारं आहे. शरीराने ते आपल्यात नसले तरी मनाने कायम आपल्या सोबत आहेत.''

देशमुख परिवाराबद्दल बोलताना त्यांनी, ''या कुटुंबावर सर्वांचे आशीर्वाद कायम राहू द्या. लेकरांच्या पाठीशी ठामपणे उभे राहणे ही आता आपली सामूहिक जबाबदारी आहे,'' असे आवाहन केले.

यावेळी युवा नेते रोहित देशमुख, राहुल देशमुख, डॉ. अभिजीत देशमुख यांच्या समवेत ज्येष्ठ नेते एम. टी. नाना देशमुख आणि संपूर्ण देशमुख परिवाराने पुण्यस्मरण कार्यक्रमासाठी उपस्थित विविध क्षेत्रातील मान्यवरांचे हृदयपूर्वक स्वागत केले. कार्यक्रमात कीर्तन, पारायण आणि श्रद्धांजलीपर भाषणांनी वातावरण भावूक झाले होते. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### मेडिकल कॉलेजमध्ये छत्रपती

जीवनप्रवासाविषयी सविस्तर माहिती दिली. महाराजांचे अद्वितीय शौर्य, थोर राजनीती, युद्धकौशल्यासोबतच त्यांचे भाषेवरील प्रभुत्व आणि त्यांनी दाखवलेले धैर्य याबद्दल वक्त्यांनी आपल्या भाषणातून प्रकाश टाकला. महाराजांचा हा दैदिप्यमान इतिहास आजच्या तरुण पिढीने आदर्श म्हणून डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या जयंती उत्सवाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### माजलगाव-तेलगाव

अखेर ३३ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्या कामाबद्दल सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. ''राज्याचे देवदूत म्हणून काम पाहताना त्यांनी मतदारसंघाचेही देवदूत म्हणून भूमिका पार पाडली,'' अशा शब्दांत अनेकांनी त्यांचे कौतुक केले.स्थानिक नागरिकांच्या मते, केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष निधी उपलब्ध करून देणे आणि कामाला गती देणे हे महत्त्वाचे असते.डॉ ओमप्रकाश शेटे यांनी ते करून दाखवल्याने त्यांना जनतेचे आशीर्वाद मिळतील, अशी चर्चा आता माजलगाव मतदारसंघात सुरू झाली आहे. अनेकांनी सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांच्या प्रयत्नांचे स्वागत केले असून ''रस्ता झाला तर अनेकांचे जीव वाचतील,'' अशी भावना व्यक्त केली जात आहे.दरम्यान, रस्त्याच्या कामाला लवकर सुरुवात करून दर्जेदार काम पूर्ण करावे, अशी मागणीही नागरिकांकडून केली जात आहे. माजलगाव-तेलगाव मार्गाची दुरुस्ती पूर्ण झाल्यास परिसरातील वाहतूक सुलभ होणार असून व्यापार, शिक्षण आणि आरोग्य सेवांनाही मोठा फायदा होणार आहे. त्यामुळे या कामाकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

cmyk

# कांदा दरावरून शेतकरी संघटना सरकारवर आक्रमक ; आंदोलन करण्याचा दिला इशारा

मुंबई : महाराष्ट्र सरकारने कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या १,२३५ रुपये प्रति क्विंटल खरेदी दरावरून राज्यातील वातावरण तापू लागले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सातारा येथे केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या उपस्थितीत कांदा खरेदीची घोषणा केल्यानंतर महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने या निर्णयाचा तीव्र निषेध केला आहे. संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी सरकारवर जोरदार टीका करत हा निर्णय शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखा असल्याचे म्हटले आहे. सध्याच्या वाढत्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत सरकारने जाहीर केलेला दर अत्यंत अपुरा असून हा निर्णय शेतकरीविरोधी असल्याचा आरोप त्यांनी केला.



भारत दिघोळे यांनी सरकारला थेट सवाल करत म्हटले की, ऑगस्ट २०२३ मध्ये कांद्याच्या दरात मोठी घसरण झाल्यानंतर झालेल्या आंदोलनामुळे राज्य सरकारने २,४१० रु. प्रति क्विंटल दराने कांदा खरेदीची घोषणा केली होती. मात्र आता मुख्यमंत्री पदावर असतानाच देवेंद्र फडणवीस यांनी त्याच्या निम्म्याहून कमी दराची घोषणा केली आहे. गेल्या तीन वर्षांत खत, बियाणे, मजुरी, औषधे, वाहतूक, वीज आणि साठवणूक खर्चात मोठी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत १,२३५ रु. दर शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चालाही न्याय देत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, २०२३ मध्ये २,४१० रु. दर शक्य होता, तर २०२६ मध्ये महागाई वाढलेल्या काळात किमान ३,००० रु. दर का दिला जात नाही? हा निर्णय नेमका कोणाच्या हितासाठी घेतला जात आहे? कांदा उत्पादनासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागते. बियाणे, रोपे, मजुरी, रासायनिक खते, कीटकनाशके, सिंचन, वाहतूक आणि साठवणूक यावर लाखो रुपये खर्च होतात. अनेक शेतकरी कर्ज काढून पीक घेतात. मात्र बाजारात दर कोसळल्यामुळे अनेकांना कांदा अक्षरशः रस्त्यावर फेकण्याची वेळ येते. अशा परिस्थितीत सरकारने जाहीर केलेला १,२३५ रु. प्रति क्विंटल दर हा उत्पादन खर्चही भरून काढू शकत नाही, अशी भावना शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे.

कांदा विकलेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाईची मागणी : संघटनेने सरकारकडे आणखी एक महत्त्वाची मागणी केली आहे. गेल्या काही महिन्यांत अनेक शेतकऱ्यांना अत्यल्प दरात कांदा विकावा लागला. काहींना उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळाले. त्यामुळे सरकारने जाहीर केलेल्या दर आणि प्रत्यक्ष विक्री दरातील फरकाची नुकसानभरपाई थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

संघटनेच्या प्रमुख मागण्या : महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेने सरकारसमोर खालील मागण्या ठेवल्या आहेत. राज्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांचा कांदा किमान ३,००० रु. प्रति क्विंटल दराने खरेदी करावा. कमी दरात कांदा विकलेल्या शेतकऱ्यांना दरातील फरकाची नुकसानभरपाई द्यावी. नाफेड आणि एनसीसीएफ खरेदी केंद्रे तातडीने सुरू करावीत. कांदा खरेदी प्रक्रिया सुलभ आणि भ्रष्टाचारमुक्त करावी. बाजार समित्यांमधून थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करावी. खरेदीवरील अनावश्यक अटी व मर्यादा हटवाव्यात. कांदा निर्यात वाढीसाठी केंद्र सरकारने ठोस उपाययोजना कराव्यात.

# युरियाचा वापर कमी करत उत्पादन वाढवणे गरजेचे

## कृषी तज्ज्ञ डॉ. अशोक ढगे यांचे प्रतिपादन, शेतकरी मेळाव्याला प्रतिसाद





नेवासे । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धजन्य परिस्थितीमुळे रासायनिक खतांचा संभाव्य तुटवडा जाणवू शकतो. त्यामुळे युरिया खताचा वापर कमी करूनही अधिक कार्यक्षम पद्धतीने उत्पादन वाढविणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन कृषी तज्ज्ञ डॉ. अशोक ढगे यांनी केले. नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम शिवारात आयोजित शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी परिसरातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ. ढगे म्हणाले, महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये शेतकरी मोठ्या प्रमाणावर युरियाची मागणी करतात. मात्र, युरियाचा योग्य पद्धतीने वापर न झाल्याने त्याचा अपव्यय होतो. युरिया थेट मातीत देण्यापेक्षा तीन किलो युरिया १०० लिटर पाण्यात विरघळून फवारणी केल्यास पिकांना चांगला प्रतिसाद मिळतो. तसेच सकाळच्या वेळेत युरिया दिल्यास त्याचा अधिक फायदा होतो. अनेक शेतकरी दुपारच्या उन्हात खतांचा वापर करतात, त्यामुळे उष्णतेमुळे युरियाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

युरियामध्ये झिंक कोटेड, सल्फर कोटेड व नॅनो युरियाचा वापर केल्यास पिकांना अधिक फायदा होतो. तसेच युरियाचा वापर एकाच वेळी न करता विभागून दोन टप्प्यांत करावा. लागवडीच्या वेळी व त्यानंतर एक महिन्याने दिल्यास त्याची कार्यक्षमता वाढते. एकदम जास्त प्रमाणात युरिया दिल्यास पाण्यावाटे किंवा सूर्याच्या उष्णतेमुळे त्याचा ऱ्हास होऊन खर्च वाया जातो, असेही त्यांनी सांगितले.

उसासारख्या उंच पिकांमध्ये ड्रोनद्वारे युरियाची फवारणी केल्यास खताच्या खर्चात बचत होते. जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढविल्यास युरियाची गरज कमी होते. त्यासाठी ताग, धेंचा यांसारखी हिरवळीची खते घेणे फायदेशीर ठरते. तसेच चांगल्या कुजलेल्या शेणखतात युरिया मिसळून वापरल्यासही चांगले परिणाम मिळतात, असे मार्गदर्शन डॉ. ढगे यांनी केले. युरिया कमीत कमी वापरून अधिक उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्यांनी कार्यक्षम आणि शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

सेंद्रीय पदार्थांचे प्रमाण वाढवल्यास युरियाची गरज कमी उसासारख्या उंच पिकांमध्ये ड्रोनद्वारे युरियाची फवारणी केल्यास खताच्या खर्चात बचत होते. जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढविल्यास युरियाची गरज कमी होते. त्यासाठी ताग, धेंचा यांसारखी हिरवळीची खते घेणे फायदेशीर ठरते. तसेच चांगल्या कुजलेल्या शेणखतात युरिया मिसळून वापरल्यासही चांगले परिणाम मिळतात, असे मार्गदर्शन डॉ. ढगे यांनी केले.

# फवारणी नाही तर हे तीन उपाय करा आणि गुलाबी बोंडअळीला दूर ठेवा!

गेल्या काही वर्षापासून कपाशीवर गुलाबी बोंडआळीचा प्रादुर्भाव खूप मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे उत्पादनात प्रचंड प्रमाणात घट येत असून शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे. कारण गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव झाल्यानंतर कितीही प्रमाणात उपाययोजना केल्या तरी सर्व निरर्थक ठरतात.कारण या अळ्या कपाशीच्या बोंडामध्ये राहतात व आतून त्या बोंडाचा गर खातात व कापसाचे प्रत खालावते.



कपाशीच्या दृष्टिकोनातून विचार केला तर गुलाबी बोंडअळी ही सर्वात घातक कीटक समजली जाते. म्हणून नुकसान टाळायचे असेल तर फवारणी शिवाय काही एकात्मिक व्यवस्थापनाच्या पद्धती अवलंबल्या तर नक्कीच फायदा मिळू शकतो.

गुलाबी बोंडअळीचा अटकाव : कामगंध सापळ्यांचा वापर- सध्या बऱ्याच ठिकाणी पाऊस नाहीये परंतु ढगाळ वातावरण दिसून येत आहेत. अशा वातावरणामुळे बोंड आळीचे पतंग कपाशीमध्ये फिरताना दिसतात.

कारण या कालावधीमध्ये बऱ्याच ठिकाणी कापसाला पाते व फुले तसेच बोंडे लागत असल्यामुळे यामध्ये या अळीचे मादी पतंग अंडी घालतात व त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये गुलाबी बोंड अळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते. यावर नियंत्रण म्हणून कपाशीचे व्यवस्थित निरीक्षण करून गुलाबी बोंड अळी असलेल्या डोमकळ्या तोडणे व त्या जाळून किंवा जमीनीत पूर्ण नष्ट करणे हा एक चांगला उपाय आहे. तसेच एका हेक्टरमध्ये पाच कामगंध सापळे पिकाच्या उंची पेक्षा एक ते दीड फूट उंचीवर लावणे महत्त्वाचे ठरते. पतंगाचे प्रमाण जास्त असेल तर एक हेक्टरमध्ये आठ ते दहा कामगंध सापळे लावावेत.

जैविक नियंत्रण ठरेल महत्वाचे : जैविक कीड नियंत्रण पद्धतीमध्ये जर ट्रायकोग्रामा बॅक्ट्री हे परोपजीवी कीटक बोंड अळ्या खातात. त्यामुळे हे कीटक देखील खूप महत्त्वाचे ठरतात.


तसेच दुसरे महत्त्वाचे म्हणजे जर एका एकर मध्ये दोन किंवा तीन ट्रायको कार्ड लावले तरी फायदा मिळतो. परंतु कपाशी पिक साठ दिवसाचे झाल्यावर ट्रायकोकार्ड लावणे गरजेचे आहे. परंतु शेतामध्ये जर ट्रायकोकार्ड लावले तर दहा दिवस कुठल्याही प्रकारची फवारणी करू नये. हे कार्ड तुम्हाला तुमच्या विभागाच्या कृषी विद्यापीठात मिळू शकते.

शेतात पक्षीथांबे उभारावे : बोंड आळीला रोखण्याचा एक सर्वात महत्त्वाचा आणि सोपा उपाय म्हणजे पक्षी थांबे लावणे हे होय.

म्हणजे यावर पक्षी बसतात व शेतामधील अळ्या खातात. याशिवाय पाच टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरेक्टिन १५०० पीपीएम ५०० मिली किंवा बिव्हेरिया बॅसियाना बुरशीयुक्त जैविक कीटकनाशकाची जमिनीमध्ये ओल आणि हवेमध्ये आद्रता असताना ८०० ग्राम प्रति एकर याप्रमाणे फवारणी करावी.

# सिमला मिरचीवरील रोग आणि प्रतिबंधात्मक उपाय

सिमला मिरची ही भारतातील खास भाज्यांपैकी एक आहे. त्याची लागवड शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने खूप फायदेशीर ठरू शकते. सिमला मिरची ही बहुमुखी आणि उच्च मूल्याची भाजी आहे. ज्याला स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे. सिमला मिरची लागवडीसाठी ऑगस्ट महिना सर्वात खास मानला जातो. कारण या महिन्यात पावसामुळे पाण्याची समस्या नाही. या महिन्यात कोणत्याही पिकाच्या झपाट्याने वाढीबरोबरच उत्पादनही चांगले होते. जर तुम्हीही शिमला मिरचीची लागवड करण्याचा विचार करत असाल तर या कथेद्वारे तुम्हाला त्यापासून होणारे आजार आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय जाणून घेता येतील.



सिमला मिरचीचे रोग : जिवाणूजन्य पानांचे ठिपके - या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असलेले लहान, पाण्यात भिजलेले ठिपके दिसतात, जे नंतर तपकिरी किंवा काळे होतात. हे टाळण्यासाठी रोग प्रतिकारक वाणांचा वापर करावा. वरून झाडांना पाणी द्या जेणेकरून पाणी पानांवर पडणार नाही. जमिनीत रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत रहा.

फायटोफथोरा ब्लाइट - हे देठ आणि फळांवर खोल पाण्यात भिजलेले जखम दाखवते. याच्या प्रभावामुळे पाने कोमेजून कुजण्याची लक्षणे दिसू शकतात. हे टाळण्यासाठी पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नका. पानांवर जास्त पाणी देणे आणि सिंचन टाळा. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाका. ज्यामध्ये, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशक वापरा.

व्हर्टिसिलियम विल्ट - पाने पिवळी आणि कोमेजतात. काही प्रकरणांमध्ये पाने पूर्णपणे मरतात. हे टाळण्यासाठी प्रमाणित रोगमुक्त बियाणे व रोपे वापरावीत. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करा आणि जास्त सिंचन टाळा. जमिनीत रोगजनकांचा जमाव कमी करण्यासाठी पिके फिरवा. या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नाहीत, त्यामुळे प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष केंद्रित केले जाते.

पावडर बुरशी - यामध्ये पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके दिसतात. हे टाळण्यासाठी, हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवा. झाडांभोवती ओलावा कमी करण्यासाठी ओव्हरहेड पाणी देणे टाळा. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरा.

ऍफिडचा प्रादुर्भाव - ऍफिड हे लहान आणि मऊ शरीराचे कीटक आहेत जे वनस्पतींमधून रस शोषतात. यामुळे वाढ खुंटते आणि पाने विकृत होतात. हे टाळण्यासाठी, लेडीबग्स आणि लेसविंग्स सारख्या नैसर्गिक भक्षकांना प्रोत्साहन द्या. ऍफिड लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कीटकनाशक किंवा कडुलिंबाच्या तेलाचा वापर करा. वनस्पतींभोवती ॲल्युमिनियम फॉइल ऍफिड्सला प्रतिबंध करू शकते. येथे लक्षात घेण्याजोगा मुद्दा असा आहे की जेव्हा वनस्पती रोगांचे व्यवस्थापन करण्याचा विचार येतो तेव्हा उपचारापेक्षा प्रतिबंध नेहमीच चांगला असतो. कोणतेही पीक रोगांपासून दूर ठेवण्यासाठी, योग्य स्वच्छता राखणे, रोग प्रतिरोधक वाणांचा वापर करणे आणि झाडे निरोगी ठेवण्यासाठी योग्य परिस्थिती प्रदान करणे आवश्यक आहे.




### महत्वाच्या घटना

१८६६ : अमेरिकेत पाच सेन्ट किंवा निकेल हे नाणे व्यवहारात आणले.
१८९९ : क्रांतिकारक बाळकृष्ण चाफेकर यांना फाशी.
१२०४ : बाल्डविन नववा पहिला लॅटिन सम्राट झाला.
१६०५ : पॉल पाचवा पोपपदी.
१९१८ : अमेरिकेत सरकारवर टीका करणे हा तुरुंगवासास पात्र गुन्हा ठरवण्यात आला.
१९२० : पोप बेनेडिक्ट पंधराव्याने जोन ऑफ आर्कला संत ठरवले.
१९२९ : हॉलिवूडच्या अ‍ॅकेडमी ऑफ मोशन पिक्चर, आर्ट्स अँड सायन्सेस या संस्थेतर्फे चित्रपटांतील उत्कृष्ट कामगिरीबद्दल स्मृतिचिन्ह देण्याचा पहिला समारंभ झाला. याच पारितोषिकांना पुढे ऑस्कर असे नाव पडले.
१९६९ : सोवियेत संघाचे अंतराळयान व्हेनेरा ५ शुक्रावर उतरले.
१९७५ : सिक्कीममधील जनतेने कौल दिल्यावर भारताने सिक्कीमला देशाचा भाग करून घेतले.
१९७५ : जुन्को ताबेई एव्हरेस्टवर चढणारी प्रथम स्त्री ठरली.
१९९३ : बचेन्द्री पालच्या नेतृत्वाखालील पहिल्या महिला भारतीय मोहिमेने सात मुलींसह अठरा गिर्यारोहकांना एव्हरेस्ट पादाक्रांत करण्याचा मान मिळवून दिला व नवा जागतिक विक्रम नोंदविला.
१९९२ : स्पेस शटल एन्डेव्हरची प्रथम अंतराळयात्रा सफल.
१९९६ : भारताचे १० वे पंतप्रधान म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांनी सूत्रे हाती घेतली. मात्र आवश्यक पाठिंबा न मिळाल्यामुळे त्यांचे सरकार केवळ १३ दिवस टिकले.
२००० : बॅडमिंटन अधिकाधिक लोकाभिमुख करण्यासाठी तसेच खेळांचे दूरचित्रवाणी प्रसारण सुलभ करण्यासाठी या खेळातील गेम १५ ऐवजी ७ गुणांचा करण्याचा निर्णय आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन महासंघाच्या क्वालालंपूर येथील बैठकीत घेण्यात आला. मात्र २००६ मधे हा नियम परत बदलला गेला.
२००५ : कुवेतमधे स्त्रियांना प्रथमच मतदानाचा हक्क प्राप्त झाला.
२००५ : अमेरिकन वैज्ञानिकांनी क्लोन केलेल्या मानवी भ्रूणाच्या शरीरातून स्टेम पेशी काढण्यात पहिल्यांदा यशस्वी झाले.
२००७ : निकोलाय सारकॉझी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२५ : आद्य गणिती, आधुनिक भास्कराचार्य केरुनाना लक्ष्मण छत्रे यांचा जन्म. (मृत्यू: १९ मार्च १८८४)
१८३१ : मायक्रोफोन चे सहसंशोधक डेव्हिड एडवर्ड ह्यूजेस यांचा जन्म. (मृत्यू: २२ जानेवारी १९००)
१८२४ : महान गणितज्ज्ञ केरो लक्ष्मण छत्रे यांचा जन्म
१८५७ : भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पटना येथील २७ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष रघुनाथ मुधोळकर यांचा जन्मदिन.
१९०५ : अमेरिकन अभिनेते हेन्री फोंडा यांचा जन्म. (मृत्यू: १२ ऑगस्ट १९८२)
१९२६ : माणिक वर्मा, शास्त्रीय व सुगम संगीत गायिका.
१९३१ : के. नटवर सिंग, भारतीय परराष्ट्र मंत्री.
१९४१ : संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय टक्करवादक बनामाली महाराणा यांचा जन्मदिन.
१९४४ : महाराष्ट्रातील एक प्रसिध्द लोकनेते अभयसिंह राजे भोसले यांचा जन्म
१९५३ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय बायोफिजिकल वैज्ञानिक प्राचार्य रामकृष्ण विजयाचार्य होसूर यांचा जन्मदिन.
१९५५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय हातमाग उद्योजक गजम अंजैया यांचा जन्मदिन.
१९७० : गॅब्रियेला सॅबाटिनी, आर्जेन्टिनाची टेनिस खेळाडू.
१९७५ : निरोशन बंदरतिलके, श्रीलंकेचा क्रिकेट खेळाडू.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६५ : पुरंदर किल्ला लढविताना मराठेशाहीतील स्वामीनिष्ठ सरदार मुरारबाजी देशपांडे यांचे प्राणार्पण
१८३० : फ्रेन्च गणितज्ञ व भौतिकशास्त्रज्ञ जोसेफ फोरियर यांचे निधन. (जन्म: २१ मार्च १७६८)
१९२६ : महमद सहावा, शेवटचा ओस्मानी सम्राट.
१९५० : कोल्हापूर संस्थानचे दिवाण व शिक्षणमंत्री अण्णासाहेब लठ्ठे यांचे निधन. (जन्म: ९ डिसेंबर १८७८)
१९७७ : माली देशाचे पहिले अध्यक्ष मादीबो केएटा यांचे निधन. (जन्म: ४ जुन १९१५)
१९९० : द मपेट्स चे जनक जिम हेनसन यांचे निधन. (जन्म: २४ सप्टेंबर १९३६)
१९९४ : माधव मनोहर, लेखक, समीक्षक.
१९९४ : चित्रपट निर्माते, दिग्दर्शक व पटकथा लेखक फणी मुजुमदार यांचे निधन. (जन्म: २८ डिसेंबर १९११ फरिदपूर, बांगला देश)
२००० : माधव गोविंद काटकर, मराठी कवी.
२००८ : ओपस वन व्हाइनरी चे सहसंस्थापक रॉबर्ट मोन्डवी यांचे निधन. (जन्म: १८ जुन १९१३)
२०१४ : टाटा स्टीलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक रुसी मोदी यांचे निधन. (जन्म: १७ जानेवारी १९१८)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# जनगणना २०२७ अंतर्गत घरसूचीकरण व घरगणना मोहिमेची आजपासून सुरुवात

जालना। प्रतिनिधी

भारत सरकारच्या निर्देशानुसार देशातील १६ वी जनगणना प्रक्रिया जानेवारी २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत दोन टप्प्यांत राबविण्यात येणार असून, त्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असलेल्या घरसूचीकरण आणि गृहगणना मोहिमेला जिल्ह्यात १६ मे, २०२६ म्हणजे आजपासून सुरुवात होत आहे. ही प्रक्रिया १४ जून, २०२६ पर्यंत चालणार असून, यासाठी नियुक्त करण्यात आलेले प्रगणक व पर्यवेक्षक घराघरांत जाऊन माहिती संकलन करणार आहेत. जिल्हा प्रशासनाकडून या मोहिमेसंदर्भातील सर्व आवश्यक सूचना व माहिती प्रसिद्ध करण्यात आली असून, नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, १५ मे २०२६ रोजी सर्व प्रगणक व पर्यवेक्षकांना ट्रेनिंग ॲप काढून अधिकृत ॲप डाउनलोड करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. १६ मे पासून प्रत्यक्ष मॅपिंगच्या कामास सुरुवात होणार असून, प्रगणक आपल्या नियुक्त क्षेत्राची पाहणी करून कच्चे नकाशे तयार करतील. त्यानंतर १६ ते १८ मे दरम्यान प्रगणक, पर्यवेक्षक आणि चार्ज ऑफिसर यांच्या समन्वयाने सीमांकन व इमारतींचे रेखांकन पूर्ण केले जाणार आहे. १९ ते २० मे या कालावधीत प्रत्येक घरावर 'सी.एच. नंबर' टाकण्याचे काम करण्यात येणार असून, ही प्रक्रिया उत्तर-पश्चिम दिशेकडून दक्षिण-पूर्व दिशेकडे केली जाणार आहे. यानंतर २१ मे ते ०५ जून, २०२६ या मुख्य कालावधीत प्रगणक मोबाईल ॲपच्या सहाय्याने घराघरांत जाऊन ०१ ते ३३ प्रश्नांद्वारे माहिती संकलित करणार आहेत. ०६ ते १४ जून, २०२६ या अंतिम टप्प्यात ''फायनल सिंक'' व तपासणी प्रक्रिया पार पडणार असून, वरिष्ठ अधिकारी रॅन्डम पद्धतीने प्रत्यक्ष पाहणी करून माहितीची पडताळणी करणार आहेत. घरगणना मोहिमेत डिजिटल तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात येणार आहे. प्रगणकांकडून दर ५ ते १० नोंदीनंतर डेटा सिंक केला जाणार आहे. तसेच इमारतींचे क्रमांक आणि सीएच नंबर यामध्ये कोणताही बदल करता येणार नसल्याने माहिती नोंदविताना विशेष दक्षता घेतली जाणार आहे. प्रत्येक इमारतीवर व घराबाहेर प्रत्यक्ष क्रमांक लिहिणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय, स्वतः ऑनलाईन पद्धतीने जनगणना करणाऱ्या कुटुंबांना ' ' प्राप्त करून घ्यावा लागणार असून, घरभेटी दरम्यान प्रगणकांकडून त्याची पडताळणी केली जाणार आहे.

## नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन

''जनगणना २०२७ हे देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल असून, सर्व नागरिकांनी आपल्या घरी येणाऱ्या प्रगणकांना सहकार्य करून अचूक माहिती द्यावी,'' असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, अचूक आणि तंत्रज्ञानाधारित पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून, नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीवरच भरोसा ठेवावा, असेही प्रशासनाने आवाहन केले आहे.

## जामखेड नगर परिषद हद्दीत जनगणना-घरगणना मोहिमेला प्रारंभ



जामखेड। प्रतिनिधी

भारतीय जनगणना २०२६-२७ अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणना मोहिमेला जामखेड नगर परिषद हद्दीत उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला आहे. ही मोहीम १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार असून नगरपरिषद क्षेत्रातील सर्व घरांची अचूक माहिती संकलित करण्यात येणार आहे.

या राष्ट्रीय उपक्रमासाठी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजय साळवे हे चार्ज ऑफिसर म्हणून कार्यरत आहेत. तसेच जनगणना अधिकारी महेश शेकडे, अमीर शेख, महेश कवादे व अतुल राळेभात यांनी मोहिमेचे नियोजन केले आहे.घरगणना मोहिमेत ८० प्रगणक शिक्षक, १३ पर्यवेक्षक तसेच नगरपरिषद जनगणना विभागातील ३ कर्मचारी प्रत्यक्ष सहभाग घेणार आहेत. घरांची माहिती संकलित करणे, नकाशे तयार करणे तसेच कुटुंबीयांची आवश्यक माहिती नोंदविणे आदी कामे या मोहिमेत केली जाणार आहेत.मुख्याधिकारी अजय साळवे यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, ''जनगणना हे देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. प्रगणक शिक्षक घरी आल्यानंतर नागरिकांनी अचूक माहिती देऊन राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.''प्रगणक शिक्षक मयूर भोसले यांनीही ''जनगणना हे राष्ट्रीय कर्तव्य असून ते यशस्वी करण्यासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत,'' असे सांगितले. जामखेड नगर परिषद प्रशासन, शिक्षक व कर्मचारी यांच्या समन्वयातून ही मोहीम प्रभावीपणे राबविली जात असून नागरिकांकडूनही सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# राष्ट्रीय डेंग्यु दिनानिमित्त आरोग्य विभागाकडून जनजागृती




जालना। प्रतिनिधी

जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत मोटार सायकल रॅली काढण्यात आली. तसेच विविध जागृतीपर उपक्रम राबवुन या वेळी डेंग्यु रोग नियंत्रणाबाबत डॉ.जी.डी.म्हस्के अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी,डॉ.राजेंद्र गाडेकर सहाय्यक जिल्हा शल्यचिकित्सक, श्री.बोराडे ,जिल्हा माध्यम विस्तार अधिकारी, डॉ. जी. डी. म्हस्के यांनी परिचारीकांना, आशा स्वयमंसेविका, उपस्थित नागरीकांना डेंग्यु रोग नियंत्रण प्रतिबंधात्मक उपययोजना बाबत मार्गदर्शन केले.

यावर्षीचे घोषवाक्य डेंग्यु नियंत्रणासाठी लोकसहभागः साठलेल्या पाणीसाठयांची तपासणी करा,स्वच्छता राखा ती भांडी झाकुन ठेवा'असे आहे. तसेच डेंग्यु रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना व नियंत्रणाकरीता आरोग्य प्रदर्शनाचे उद्? घाटन डॉ.राजेंद्र गाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ.जी.डी.म्हस्के यांनी यावेळी परिसर स्वच्छता तसेच वैयक्तीकरीत्या करावयाच्या उपाययोजना, खिडक्यांना डास प्रतिबंधक जाळी बसविणे,सांडपाण्याची डबकी वाहती करणे,आठवडयातुन एक दिवस कोरडा दिवस पाळणे,झोपतांना मच्छरदाणीचा वापर करणे,आदी उपाययोजनांची माहिती देऊन डेंग्यु रोगाच्या वाढीस कारणीभुत ठरणाऱ्या एडीस डासांच्या अळया नष्ट करणारे गप्पीमासे दाखवुन डेंग्यु आजार लक्षणे,तापात चढउतार होणे,थंडी वाजुन ताप येणे,डोकेदुखी,मळमळने असे डेंग्युची लक्षणे दिसताक्षणी मोफत शासकिय रुग्णालयात तपासणीचे आवाहन केले. शासकिय रुग्णालयात मोफत रोगनिदान व औषधोपचार उपलब्ध आहे. उपक्रम यशस्वी करण्याकरीता श्री.एस.व्ही.वाडेकर सहा.जिल्हा हिवताप अधिकारी,तांत्रिक प्रमुख श्री.व्ही.एस.गवळी, श्री.पी.एस.बावणे, श्री.जी.एम.देशपांडे, श्री.पी.एस.पवार (आरोग्य निरिक्षक),श्री.नितिन सोनकर,श्री.किरण काळे,सौरभ मुंढे (प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी)कृष्णा कापरे (आरोग्य कर्मचारी )तसेच किटकसमाहारक,वाहन चालक, शहरातील सर्व आरोग्य कर्मचारी व कार्यालयाचे क्षेत्र कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# माजी मंत्री आ. लोणीकर यांच्या प्रयत्नांना यश

## यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेतील रखडलेला निधी प्राप्त



मंठा। प्रतिनिधी

मंठा परतूर विधानसभा मतदारसंघाचे माजी मंत्री,आ.बबनराव लोणीकर यांच्या प्रयत्नांना यश आले असून मागील अनेक वर्षापासून यशवंतराव चव्हाण घरकुल योजनेचा जिल्ह्यातील उर्वरित निधी जमा होत नव्हता. त्यामुळे गोरगरीब तांड्यावरील जनता निधीच्या प्रतीक्षेत होती. या निधीच्या मागणीसाठी श्री लोणीकर यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून निधी प्राप्त करून घेतला असल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.तसेच

यामुळे अनेक गरजू कुटुंबाच्या घराच्या स्वप्नांना नवी आशा मिळाली आहे राज्य शासनाच्या यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना २०२४ - २५ अंतर्गत पात्र ठरल्या लाभार्थ्यांना निधी वितरणाचा मार्ग मोकळा झाला आहे यासंदर्भात श्री लोणीकर यांनी शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करीत संबंधित विभागाकडे निधी तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणी लावून धरली होती त्यांच्या प्रभावी प्रयत्नामुळे निधी मंजुरीची प्रक्रिया पूर्ण झाली असून प्रशासनाकडून लाभार्थ्यांना निधी वितरत करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. ग्रामीण व तांडा भागातील अनेक कुटुंबे गेल्या अनेक दिवसापासून स्वतःच्या हक्काच्या घराच्या प्रतीक्षेत होती आता निधी उपलब्ध झाल्यामुळे घरकुलाचे कामे वेगाने सुरू होणार असून अनेक गरीब व वंचित कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार आहे.हा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. बबनराव लोणीकर यांचे उमरखेडा येथील सरपंच आनंद जाधव यांच्यासह बंजारा बांधवातून आभार व्यक्त केले जात आहे. याबाबत प्रतिक्रिया देताना सरपंच तथा भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद जाधव यांनी सांगितले की, सामान्य नागरिकांच्या प्रश्नासाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करणारे नेतृत्व म्हणून आ.बबनराव लोणीकर यांची ख्याती आहे व गोरगरिबाच्या कामावर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवणारे ते नेते आहेत. या योजने मध्ये विशेष करून उमरखेडा येथील १०१ लाभार्थी असल्याचे त्यांनी सांगितले. घरकुल लाभार्थ्यांचा प्रश्न मार्गी लागल्याने अनेक गरीब कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे दरम्यान पात्र लाभार्थ्यांना निधी जलद गतीने वितरीत करून घरकुल कामात गती देण्याच्या सूचना संबंधित प्रशासनाला देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

## द्वारकाबाई आगळे यांचे निधन

जालना। प्रतिनिधी



शहरातील जुना जालना भागातील बरवार गल्लीतील रहिवाशी श्रीमती द्वारकाबाई नारायणराव आगळे (९५) यांचे वृद्धापकाळाने गुरूवार दि.१४ मे २०२६ रोजी रात्री निधन झाले आहे.आज शुक्रवार दि.१५ मे रोजी सकाळी रामतीर्थ स्मशान भूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात तीन मुलं, एक मुलगी,सूना, नातवंडं असा मोठा परिवार आहे.जालना येथील जिल्हा पोलिस दलातील सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सुरेश आगळे यांच्या त्या आई होत.

## कांद्याला मातीमोल भाव, रस्त्यावर टाकून निषेध

### प्रतिकिलो एक रुपया ते ११ रुपयांचा भाव, शेतकऱ्यांचा आंदोलनात संताप



पारनेर। प्रतिनिधी

मशागत, खते, किटकनाशक तसेच मजुरी याचा खर्च वाढता असला, तरी शेतकऱ्यांनी पिकवलेल्या कांद्याला मात्र मागील चार ते पाच वर्षांत काही दिवसांचा अपवाद वगळता समाधानकारक भाव मिळाला नाही.

वाढलेला उत्पादन खर्च व तुलनेत घसरत असलेले बाजारभाव यामुळे कांदा उत्पादकांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. यापार्श्वभूमीवर संतप्त शेतकऱ्यांनी गुरुवारी अहिल्यानगर-कल्याण राष्ट्रीय महामार्ग अडवून, रस्त्यावर कांदा ओतला. सरकारविरोधी जोरदार घोषणाबाजी करत निषेध नोंदवण्यात आला.

राष्ट्रवादीचे नेते, नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली आणि खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी काही काळ पूर्णपणे ठप्प झाली होती.

वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र महामार्गावर होते. कांद्याला सध्या अत्यंत कमी दर मिळत असल्याने उत्पादन खर्चही निघत नसल्याची आंदोलनात माणुसकीचे दर्शन अहिल्यानगर-कल्याण महामार्गावर सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान कल्याणकडून अहिल्यानगरच्या दिशेने एक रुग्णवाहिका रोरावत येताना दिसली. त्यावेळी तत्काळ रुग्णवाहिकेला मार्ग करून आंदोलनस्थळी माणुसकीचे दर्शन घडवले.

## तब्बल ९०९ कोटींच्या निधीवर जिल्हा नियोजन समितीची मोहोर

छत्रपती संभाजीनगर

जिल्ह्याच्या विकासासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात ९०९ कोटी २१ लाख रुपयांच्या नियतव्ययास जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. शिक्षण, वीज, सौरऊर्जा, ग्रामीण पायाभूत सुविधा, आरोग्य सेवा आणि कायदा सुव्यवस्था यांवर बैठकीत विशेष भर देण्यात आला.

पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन सभागृहात बैठक पार पडली. बैठकीस मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार अंबादास दानवे, आमदार विक्रम काळे, सतीश चव्हाण, प्रदीप जयस्वाल, रमेश बोरनारे, प्रशांत बंब, संजना जाधव, विलास भुमरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत सन २०२५-२६ साठी मंजूर करण्यात आलेल्या सर्वसाधारण ७३५ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजना १०४ कोटी रुपये आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना १० कोटी ४६ लाख रुपये या निधीच्या खर्चास मान्यता देण्यात आली. प्रशासनाने या निधीचा शंभर टक्के खर्च झाल्याची माहिती दिली.

## विक्रम साळी जालन्याचे नवे अप्पर पोलीस अधीक्षक

जालना । प्रतिनिधी



महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाने आज गृह दि. १५ मे रोजी राज्यातील ४४ आयपीएस अधिका-यांच्या बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यात आले असून यामध्ये श्री. विक्रम महादे साळी यांची अप्पर पोलीस अधीक्षक म्हणुन जालन्यात बदली करण्यात आली आहे. श्री. साळी हे यापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील राज्य राखीव पोलीस बल गटाचे

महसमादेशक म्हणुन तत्कालीन अप्पर कार्यरत होते. जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांची पदोन्नतीने चंद्रपूर जिल्हयाचे पोलीस अधीक्षक म्हणुन बदली झाल्यानंतर जालन्याची जागा रिक्त होती. या रिक्त जागेवर श्री. विक्रम साळी यांची आज नेमणुक करण्यात आली आहे. गृह विभागाचे सहसचिव सुग्रीव धपाटे यांनी या संदर्भातील बदल्याचे आज निर्गमित केले आहे.

# तलाठी कार्यालय आणि पोलीस इमारतीसाठी अजूनही खरवंडीकरांसाठी वेट अँड वॉच!

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील भटक्या पंढरीतील ऊस तोडणी कामगारांच्या पट्ट्यातील खरवंडी कासार हे दळणवळण व्यापारी क्षेत्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे उपनगर असून येथे मात्र नेहमी दरोडे चोऱ्या रस्ते लुटमार आणि अनेक गंभीर गुन्हे घडत असून सुद्धा गेल्या दहा वर्षांपासून खरवंडी कासार हे उपनगर नवीन पोलीस इमारत आणि नवीन पोलीस स्टेशन मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे तर दुसरीकडे महसूल विभागाच्या अत्यंत महत्त्वाच्या आणि गोरगरीब लोकांच्या महसुली दप्तरीच्या कामकाजामुळे तब्बल ५० किलोमीटर वरून भालगाव खरवंडी ते पाथर्डी असा प्रवास येथील ऊसतोड मजूर कामगारांना करावा लागत आहे नागरिकांना महसुली प्रशासनाच्या अत्यंत महत्त्वाच्या सेवा ऑनलाईन पद्धतीने मिळाव्यात जमिनीची नोंद विहिरीची नोंद सातबारा आठ अ उतारे अशा विविध प्रकारच्या सेवा आणि इतर तलाठ्यांच्या मार्फत होणारी कामे ही दहा ते पंधरा दिवस रखडले जातात आणि तलाठी किंवा मंडळ अधिकारी हे दहा ते पंधरा दिवसात कामगार तलाठी कार्यालयात उपस्थित नसतात यामुळे लोकांच्या महसुली दप्तरीच्या कामकाजासाठी त्यांना सरकारी काम आणि पाच महिने थांब अशा पद्धतीने थांबावे लागते यामुळे खरवंडी कासार हे मध्यवर्ती उपनगर असल्याने जवळपास दहा ते पंधरा गावचा महसुली कारभार कामगार तलाठी कार्यालयातून चालतो परंतु येथे मात्र सरकारी प्रशासकीय इमारत नसल्याने महसुली अधिकारी कर्मचाऱ्यांसह लोकांची गैरसोय होत असल्याने लोकप्रतिनिधी आमदार मोनिका राजळे यांनी विशेष लक्ष घालून खरवंडी कासार येथे नवीन पोलीस स्टेशन निर्मिती नवीन पोलीस प्रशासकीय इमारत आणि कामगार तलाठी कार्यालय मंजूर करावे व येथील नागरिकांची गैरसोय दूर करावी अशी मागणी भगवानगड परिसरातील नागरिकांनी केली आहे.



### तलाठी कार्यालय व पोलीस चौकी बनली शोभेची वास्तू ?

तोंडी कासार येथील कामगार तलाठी कार्यालय व पोलीस चौकी हे ग्रामपंचायत खरवंडी कासार यांच्या हद्दीत किंबहुना जागेत असून तेथे घाणीचे साम्राज्य पसरले असून मुतारीसाठी आणि अवैध देशी दारूच्या बाटल्या पोलीस चौकीत आणि तलाठी कार्यालयात पडून असतात सरकारी कार्यालय आहे की एखादा कुंटणखाना अशी परिस्थिती या दोन्ही कार्यालयाची असल्याने येथे कोणाचेही नियंत्रण नाही पंधरा दिवसातून एकदा येथे पोलीस चौकी किंवा तलाठी कार्यालयाचे कामकाज चालते पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना येथे थांबावेशे वाटत नाही यामुळे खरवंडी कासार हे मराठवाड्याच्या सरहद्दीवर असल्याने येथे नेहमी चोरी रस्ते लूटमार अशा गंभीर स्वरूपाच्या घटना घडत असतात परंतु इंग्रज राजवटीप्रमाणे भगवानगड परिसरात भटक्यांच्या ऊसतोड मजुरांच्या वाट्याला कायम संघर्ष पाचवीला पुजलेला आहे.

### आ.मोनिका राजळे तुम्ही या परिसराच्या पालक आहात लक्ष द्या !

वर्षानुवर्ष दुर्लक्षित राहिलेल्या खरवंडी कासार येथील नवीन कामगार तलाठी कार्यालय व पोलीस प्रशासकीय इमारतीसाठी तुम्ही पुढाकार घ्यावा असे भाजप सहकार आघाडीचे वामन कीर्तने हे मागणी करत आहेत किमान भाजप पक्षातील तुमच्या कार्यकर्त्यांच्या मागणीला न्याय द्यावा अशी अपेक्षा आहे.

## आरापूरजवळ आयशरची उभ्या टेम्पोला धडक

### २ जागीच ठार, २ गंभीर जखमी, आयशर चालक घटनास्थळावरून फरार

लासूर । प्रतिनिधी

लासूर स्टेशन रस्त्याच्या कडेला लघुशंकेसाठी थांबलेल्या डीजेच्या टेम्पोला भरधाव आयशरने पाठीमागून जोरात धडक दिल्याने झालेल्या अपघातात २ जण जागीच ठार तर दोन जण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी पहाटे ३.३० वाजेच्या सुमारास मुंबई-नागपूर मार्गावरील आरापूर शिवारामध्ये घडली.राहुल दिलीप राठोड (२१, रा. कुंभेफळ), गोविंद पुंडलिक तनपुरे (३०, रा. जळगाव ता. छत्रपती संभाजीनगर) अशी मृतांची नावे आहेत. शिल्लेगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संभाजीनगरवरून एका लग्न समारंभाच्या कार्यक्रमासाठी डीजेचा टेम्पो हा वैजापूरकडे जात असताना आरापूर शिवारात लघुशंकेसाठी रस्त्याच्या कडेला डीजे टेम्पो (एमएच ०४ एफडी ८१०४) चालकाने उभा केला.

यावेळी शेंद्रावरून डोंबिवलीकडे मालवाहतूक करणारा आयशर (एमएच २० ईएल १७७९) ने डीजेच्या टेम्पोला पाठीमागून जोराची धडक दिली. यामध्ये डीजे हा रस्त्याच्या कडेला पलटी झाल्याने अपघातात राहुल दिलीप राठोड, गोविंद पुंडलिक तनपुरे यांचा जागीच मृत्यू झाला. तर जखमींवर छत्रपती संभाजीनगर येथे उपचार सुरू आहे. दरम्यान, अपघातानंतर आयशर चालक घटनास्थळावरून फरार झाला आहे. डीजेला मिळाली सुपारी संभाजीनगरवरून एका लग्न समारंभाच्या कार्यक्रमासाठी डीजेचा टेम्पो हा वैजापूरकडे जात होता. लघुशंकेसाठी चालकाने टेम्पो आरापूर शिवारात उभा केला. मात्र, त्याचवेळी भरधाव आयशरने टेम्पोला पाठीमागून जोराची धडक दिली. यात टेम्पोमधील दोघे जागीच ठार झाले तर दोघे गंभीर जखमी आहेत.


# वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिक हैरान

## शहरी भागात रात्री आणि ग्रामीण भागात दिवसा वारंवार विज होते गायब!

बीड । प्रतिनिधी

सध्याच्या कडक उन्हाळ्यामध्ये वीज वितरण कंपनीने नागरिकांच्या भावनांशी खेळ चालवला असून शहरांमध्ये अचानक रात्री वीज गायब होते आणि ग्रामीण भागात दिवसभरात कित्येकदा गायब होते. याचा हिशोब नाही सध्याच्या परिस्थितीमध्ये शहरांमध्ये रात्रीच्या वेळी वीज वितरण कंपनी नागरिकांना शांत झोपू देत नाही तर ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी देऊ देत नाही अशी परिस्थिती असून वीज वितरण कंपनीचा हा तमाशा आणखी किती दिवस चालणार असा संतप्त सवाल नागरिक करत आहेत. विशेष म्हणजे रात्री बाराच्या नंतर असा कोणता लोड वाढतो ज्यामुळे वारंवार वीज खंडित होते. याचा शोध अद्याप नागरिकांना लागत नाही वीज वितरण कंपनीचे नेमके काय चालू आहे? याचा थांग पत्ता प्रशासनालाही लागेनासा झाला आहे.

शहरे व ग्रामीण भागातील सध्या वीजपुरवठ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून शेतकरी व नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. सतत खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे शेतीचे नियोजन कोलमडले असून पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे.



कडक उन्हाळ्यात आधीच पाण्याची टंचाई जाणवत असताना वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने विहिरीवरील मोटारी बंद पडत आहेत. त्यामुळे जनावरांच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे. अनेक नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याचे चित्र परिसरात दिसून येत आहे. स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, दिवसभरात अनेक वेळा वीज जाते आणि पुन्हा तासन तास येत नाही. त्यामुळे घरगुती कामे, विद्यार्थ्यांचा अभ्यास तसेच शेतातील कामे पूर्णपणे विस्कळीत झाली आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जातो; मात्र समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याची तक्रार नागरिकांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, काही अधिकारी परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करत असले तरी प्रत्यक्षात समस्या कायम असल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी वाढत आहे. "शेतकऱ्यांनी शेती करायची कशी?" असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे. वीजपुरवठा तातडीने सुरळीत न झाल्यास महावितरण कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे. प्रशासनाने त्वरित लक्ष घालून नियमित वीजपुरवठा सुरू करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. ग्रामीण परिसरातील नागरिकांनी व शेतकऱ्यांनी संबंधित इंजिनिअर यांच्या कामकाजाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असताना नागरिकांकडून फोन करून माहिती घेण्याचा प्रयत्न केला जातो; मात्र अनेकदा प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.वीज समस्येमुळे शेती, पाणीपुरवठा आणि दैनंदिन जनजीवन विस्कळीत झाले असताना संबंधित अधिकाऱ्यांकडून अपेक्षित गांभीर्य दाखवले जात नसल्याची भावना परिसरात निर्माण झाली आहे. त्यामुळे "सततच्या तक्रारी आणि नागरिकांच्या नाराजीनंतरही वरिष्ठ अधिकारी संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार का?" असा सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे. परिसरातील नागरिकांनी महावितरण प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन जबाबदार अधिकाऱ्यांची चौकशी करावी व वीजपुरवठा तातडीने सुरळीत करावा, अशी मागणी केली आहे.

### रात्रीच वीज गायब

नागरिकांना उकाड्यामुळे एक तर झोप लागत नाही आणि रात्री बारानंतर झोप लागायच्या वेळेत नेमकी वीस गायब असते. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून वीज वितरण कंपनीचा हा कारभार आणखी किती दिवस चालणार? यांना कोणी जाब विचारणार आहे की नाही? असा प्रश्न या निमित्ताने निर्माण झाला आहे.

### पाण्याअभावी पिके करपली

ग्रामीण भागामध्ये दिवसा वारंवार वीज खंडित होत असल्याने विहिरीमध्ये पुरेसे पाणी असतानाही शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येत नाही तासनतास विजेची वाट पाहायची वेळ आली आहे. त्यामुळे आता पिके करपू लागली असून शेतकऱ्यांचा भाजीपाला, फळबागा याचे अतोनात नुकसान होत आहे. मात्र याचे काहीही देणे घेणे वीज वितरण कंपनीला असल्याचे दिसत नाही.

# कार-दुचाकीच्या अपघातात दोघे ठार

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी नगर-अहमदपूर मार्गावरील लिंबागणेश येथे शुक्रवारी मध्यरात्री कार, दुचाकीचा भीषण अपघातात दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यु झाला.

बबन काशिनाथ लगास आणि ज्ञानदेव विष्णू लगास दोघे रा. चिखलबीड (ता. वडवणी) असे मयतांची नावे असल्याचे समजते. शुक्रवार (दि. १५) रात्री पावणे बारा वाजण्याच्या सुमारास विस्टा कार क. एमएच ०५ एएक्स ०३८८ आणि हिरो सलेंडर दुचाकी क्र. एमएच ४४ एए ६२२६ पांच्यात समोरासमोर धडक होऊन लिंबागणेश येथील भालचंद्र विद्यालय परीसरात अपघात घडला, हा अपघात इतका भीषण होता की, दुचाकीवरील दोन्ही प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यु झाला. धडकेनतर दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. नेकनूर पोलीस ठाण्याचे विठ्ठल राठोड व इतर पोलीस कर्मवाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालय, बीड येथे हलविण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून दोघांनाही मृत घोषित केले. राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी वर लिंबागणेश परिसरात वारंवार अपघात होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

# माजलगाव-तेलगाव रस्त्यासाठी ३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर

## ओमप्रकाश शेटे यांचा पुढाकार; 'शेकडो जीव वाचवणारा निर्णय' म्हणून नागरिकांकडून स्वागत

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव-तेलगाव हा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून नागरिकांसाठी अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला होता. मोठमोठे खड्डे, तुटलेले डांबरीकरण, अपघातांची वाढती संख्या आणि प्रशासनाची उदासीनता यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. अनेक सामाजिक संघटना, ग्रामस्थ आणि विविध पक्षांच्या कार्यकर्त्यांनी वेळोवेळी रास्ता रोको आंदोलन, निवेदने आणि आंदोलनाच्या माध्यमातून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली होती. मात्र, या गंभीर प्रश्नाकडे अपेक्षित गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याची भावना जनतेमध्ये निर्माण झाली होती.



अशा परिस्थितीत आयुष्मान भारत योजनेचे प्रमुख डॉ ओमप्रकाश शेटे यांनी पुढाकार घेत माजलगाव-तेलगाव रस्त्यासाठी तब्बल ३३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे. या निधीमुळे रस्त्याचे मजबुतीकरण, दुरुस्ती आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक कामे होणार असल्याने हा निर्णय शेकडो नागरिकांचे जीव वाचवणारा ठरेल, अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

माजलगाव तालुक्यातील अनेक गावांना जोडणारा हा महत्त्वाचा मार्ग असून दररोज शेकडो विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी, रुग्णवाहिका आणि सर्वसामान्य नागरिक या रस्त्याचा वापर करतात. खराब रस्त्यामुळे अनेक अपघात घडले असून काहींना आपला जीवही गमवावा लागला आहे. त्यामुळे या रस्त्याचा प्रश्न हा केवळ विकासाचा नव्हे, तर नागरिकांच्या जीवित सुरक्षेशी संबंधित प्रश्न बनला होता.डॉ ओमप्रकाश शेटे यांनी हा प्रश्न गांभीर्याने घेत संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. राज्यस्तरावर बैठका घेऊन निधीसाठी प्रयत्न केले आणि ◀◀ पान ३ वर

# डॉ.मुजीब सौदागर यांना मातृशोक

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. मुजीब सौदागर यांच्या मातोश्री आणि जुना बसस्थानक भागातील रहिवाशी असलेल्या जेष्ठ नागरिक जैनतुनबी गुलाममुस्तफा सौदागर वय ८८ वर्षे यांचे दि.१५ मे शुक्रवार रोजी निधन झाले.



त्यांच्या पार्थीवावर तकिया कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पाचे मुले,चार मुली, सुना,नातवंडे असा परिवार आहे. सौदागर परिवाराच्या दुःखात दैनीक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# जुन्या वादाची कुरापत : मारहाणीत एकाचा खुन!

## दहा आरोपितावर गुन्हा दाखल, आठवड्यात दुसरा खून

शिरूर कासार । प्रतिनिधी

जुन्या भांडणाची कुरापत काढून जातीवाचक शिविगाळ व केलेल्या मारहानीत एका ईसमाचा खुन झाल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी पाडळी येथे घडली असुन यातील दहा लोकांवर शिरूर पो स्टे ला गुन्हा दाखल करण्यात आला असुन पोलीस उपविभागिय अधिकारी यांनी घटनास्थळी भेट दिली आहे. विशेष म्हणजे याठिकाणी आठवडाभरापूर्वी गायरान जमिनीच्या वाद होवून एकाचा खून झाला होता. आठवड्यात हा दुसरा खून असून या प्रकारामुळे परिसरात खळबळ माजली आहे.

याबाबत सविस्तर मिळालेली माहिती अशी की यातील फिर्यादी अंकुश शिवराम बर्डे रा .पाडळी यांना पाडळीतील नाना जानू सरवदे ,हरि किसन पाखरे ,अक्षय राजाभाऊ सरवदे ,तात्याराम कंठाळे ,अंकुश अवंतकर ,पिनु इंगळे ,नारायण इंगळे ,बिबीशन इंगळे ,हमिद शेख ( मुकादम ) ,व सोनाजी भिवसेन सरवदे यांनी जुन्या भांडणाचा राग धरून फिर्यादी व त्यांचा मुलगा शंकर अंकुश बर्डे ( २५) यास लोखंडी गजाने व काठीने हातापायावर मार देऊन गंभिर जखमी केले ,शंकर बर्डे यास सरकारी दवाखाना बीड येथे उपचार कामी दाखल केले असता जबर मार असल्याने शनिवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास मृत्यू झाला. या प्रकरणी संबधीत दहा आरोपितावर जातीवाचक शिविगाळ करून मारहान करून खुन केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.घटनास्थळी पोलीस उपविभागिय अधिकारी गेवराई अनिल कटके यांनी भेट दिली असुन ते पुढील तपास करत आहेत .

# मेडिकल कॉलेजमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

स्थानिक सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, बीड येथे दिनांक १४ मे २०२६ रोजी स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती अत्यंत उत्साहात आणि अभिमानाच्या वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे मुख्य सल्लागार डॉ. अरुण भस्मे सर, कॉलेजचे प्राचार्य डॉ. महेंद्र गौशाल सर आणि उपप्राचार्य डॉ. गणेश पांगरकर सर व वैभव शहापूरे सर प्रामुख्याने उपस्थित होते

या कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण व नेटके सूत्रसंचालन अजय पुनेकर याने केले. त्यानंतर



महाविद्यालयाचा जनरल सेक्रेटरी मनोज वाघिरे आणि प्रमोद नागरगोजे यांनी उपस्थित विद्यार्थी आणि प्राध्यापकांना छत्रपती संभाजी महाराजांच्या ◀◀ पान ३ वर

# शहरातील जवाहर कॉलनी व परिसरातील नागरिकांना पिण्याचे पाणी ३४ दिवसाला

## किमान आठ दिवसाला पाणी सोडण्यात यावे -ॲड.अजय तादळे

बीड । प्रतिनिधी

शहरातील श्री चंपावती विद्यालयाच्या परीसरातील जवाहर कॉलनी व प्रभागात ३४ दिवसाला पाणी येत असल्याने येथील पाण्याअभावी त्रस्त झालेल्या नागरीकांनी किमान आठ दिवसाला पाणी सोडण्याची मागणी केली आहे नसता आगामी काळात स्वत:ला लोक प्रतिनिधी म्हणवुन घेणाऱ्यांना जाब विचारल्या शिवाय स्वस्थ बसणार नाही असा इशारा ॲड अजय तांदळे यांनी प्रसिद्धी माध्यमा द्वारे दिला आहे . बीड शहरात ८ दिवसाला पिण्याचे पाणी सोडले जाते पण जवाहर कॉलनी सह आजुबाजुच्या परीसरात ३४ दिवसांनंतर पाणी सोडले जाते . सूर्याची वक्र दृष्टी झालीय.तापमान ४० ते ४४ अंशावर गेलेले आहे.

आणि अशा तप्त वातावरणा मध्ये बीड नगर परिषदेची नियमित ३६५ दिवसाची नळ पट्टी भरून देखील फक्त वर्षातील ३४ दिवसच नळाला पाणी येते ,आणि त्या ३४ दिवसा पैकी आजचा एकच दिवस पाणी येत आहे .

घोरी,खिलजी,मुघल,

आणि इंग्रज यांनी आपल्या देशावर हजार अकराशे वर्ष राज्य कसं केलं असेल .खूप अभ्यास केला वेगवेगळी कारणं सापडली पण सद्य स्थितीं मधूनच माझ्या असं लक्षात आलं की , फक्त सहनशील , शोषिक , सहिष्णुता , उदार अंतःकरण या गुणांमुळेच



आपण हजारो वर्ष पारतंत्र्यात राहिलोत.आणि दुर्दैवानं याच गुणा मुळे आज देखील आपली मानसिकता तशीच आहे.कुणीही यावं आणि टिकली मारून जावं अशी अवस्था झाली आहे. नळाला ◀◀ पान ३ वर

# जिजांसारखा अजातशत्रू नेता मी आयुष्यात पाहिला नाही -धनंजय मुंडे

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा माजी आमदार स्व. आर. टी. देशमुख (जिजा) यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित पारायण व ह.भ.प. चंद्रशेखर महाराज देगलूरकर यांच्या कीर्तन कार्यक्रमात भावनिक वातावरण निर्माण झाले. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर, मित्रपरिवार, कार्यकर्ते आणि नागरिकांची प्रचंड गर्दी उपस्थित होती.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा परळी विधानसभा मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांनी स्व. देशमुख यांच्या



आठवणींना उजाळा देताना अत्यंत भावनिक शब्दांत श्रद्धांजली अर्पण केली. देवाने मोठी माणस जन्माला घातली पण कधी घेवून गेला कळाले नाही . जिजांना मी कसं सांगू, की तुमच्या प्रथम पुण्य स्मरणात बोलतोय कारण मीच आज शोकाकुल आहे," असे सांगताना सभागृहात क्षणभर शांतता पसरली. मुंडे पुढे म्हणाले, "स्व. मुंडे साहेब, स्व. पंडित आण्णा आणि देशमुख परिवार हे कायम एकरूप होते. जिजांसारखा अजातशत्रू माणूस मी आयुष्यात पाहिला नाही. कुणासोबत वैर नाही, कटुता नाही. माझ्या निवडणुकीत त्यांनी स्वतः जबाबदारी घेतली होती. समाजात माणुसकी जपणारा नेता म्हणून त्यांची ओळख कायम राहील."

"आज त्यांच्या कार्याकडे पाहिल्यावर जाणवतं की माणूस शरीराने जरी नसला तरी आपल्या कर्तृत्वातून कायम जिवंत राहतो. जिजांनी केलेलं कार्य आणि त्यांनी जपलेली माणसं हीच त्यांची खरी ओळख आहे," असेही त्यांनी नमूद केले. भावनिक होत मुंडे म्हणाले, "रामभाऊ कधी कधी देवाला म्हणावंसं वाटतं, एवढ्या मोठ्या आजारातून बाहेर पडलेला माणूस नंतर ◀◀ पान ३ वर

# नांदा फत्तेवडगाव -पिंपरी-आष्टी रस्त्याच्या कामाला गती

## सार्वजनिक बांधकाम विभागाची अतिक्रमणांवर धडक कारवाई

आष्टी । प्रतिनिधी

नांदाफत्तेवडगावपिंपरीआष्टी या महत्त्वाच्या मार्गाच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामाला वेग देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिक्रमणांविरोधात मोठी कारवाई केली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या हद्दीत अनधिकृतपणे उभारण्यात आलेली दुकाने, ओटे, पायऱ्या तसेच इतर बांधकामे पोलीस बंदोबस्तात हटविण्यात आली.

आज सकाळपासून सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता



कृष्णा पानसंबळ, इंजिनियर बादाडे, कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस बंदोबस्तात,आणि आष्टी तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर पोहे का प्रविण क्षिरसागर,तांगड मेजर,संजय तांदळे,यांच्या नेतृत्वाखाली ही मोहीम राबविण्यात आली. पोलीस दलाच्या कडक बंदोबस्तात जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यालगत उभारण्यात आलेली सर्व अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

विशेषतः माऊली मंदिर परिसरासह रस्त्यालगत अनेक ठिकाणी वर्षानुवर्षे झालेल्या अतिक्रमणांमुळे रस्त्याच्या कामात अडथळे निर्माण होत होते. तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघातांचा धोका वाढला होता. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ठोस भूमिका घेत अखेर अतिक्रमणांवर हातोडा चालविला.

नांदाफत्तेवडगावपिंपरीआष्टी हा मार्ग तालुक्यातील ◀◀ पान ३ वर

# पुरुषोत्तमपुरी रस्त्यासाठी १५ कोटी मंजूर निविदा प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अधिकमासात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आयुष्यमान भारत मिशने प्रमुख डॉ ओमप्रकाश शेटे यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.दि १५ हे २०२६ रोजी उप सचिव,महाराष्ट्र शासन यांनी पत्र निर्गमित केले असून



किट्टी आडगांव सुलतानपूर रस्ता इ.जि.मा.-६४ यावर ०/०० कि.मी.ते ४/६०० व पुरूषोत्तमपूरी ते प्र.जि.मा.-३६ रस्ता ग्रा.मा.-१९ यावर ०/०० कि.मी. ते २/५५० मध्ये रूंदीकरणासह सुधारणा करणे ता. माजलगांव जि. बीड या अंदाजित रु.१४.९३ कोटी किंमतीची २ कामे हाती घेण्यास मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. तरी सदरील कामास विहीत कार्यपध्दतीन्वये प्रशासकीय मान्यता घेवून निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी असे आदेश मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आले आहेत.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महायुती सरकारचे डॉ.ओमप्रकाश सदाशिव शेटे मनापासून आभार व्यक्त केले आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पिंपरी-चिंचवडमधील एजे फर्निचर मॉलवर लॉरेन्स बिश्नोई गँगच्या शुटर्सचा गोळीबार

## शुभम लोणकरची फेसबुक पोस्ट, व्यावसायिकाला फायनल वॉर्निंगच देऊन टाकली

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

कोयता गँगची दहशत आणि वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे सातत्याने चर्चेत असलेल्या पुणे जिल्ह्यात आता आणखी एक धक्कादायक प्रकार घडला आहे. पिंपरी-चिंचवड येथे लॉरेन्स बिश्नोई गँगच्या शार्प शुटर्सनी गोळीबार केल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली. काल रात्री ९ वाजून २४ मिनिटांच्या सुमारास हा प्रकार घडला. लॉरेन्स बिश्नोई गँगने पिंपरी-चिंचवड येथील प्रसिद्ध 'एजे' फर्निचर मॉलवर गोळीबार केला. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे लॉरेन्स बिश्नोई गँगची महाराष्ट्रातील दहशत आणि विस्तार आणखी वाढत चालल्याचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, काल लात्री ९ वाजून २० मिनिटांच्या सुमारास दोन अज्ञात हल्लेखोर बाईकवरुन एजे मॉलच्या समोर आले. या दोघांनी त्यांच्याकडील रिव्हॉल्व्हरमधून मॉलच्या दिशेने पाच ते सहा राऊंड फायर केले.




या सगळ्या गोळ्या मॉलच्या नेमप्लेटवर झाडण्यात आल्या. यानंतर हल्लेखोर तिथून पसार झाले. या घटनेची माहिती मिळताच पिंपरी चिंचवड पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि गुन्हे शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची कसून तपासणी करत फॉरेन्सिक नमूने गोळा केले. आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त गणेश इंगवले यांनी दिली.

या गोळीबाराची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई गँगचा सदस्य असलेल्या शुभम लोणकरने स्वतः घेतली आहे. त्याने तशी फेसबुक पोस्ट केली आहे. पोलिसांनी एजे फर्निचर मॉलबाहेरील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. त्यामध्ये दुचाकीवरून आलेल्या दोघांनी मॉलच्या दिशेने ५-६ गोळ्या झाडल्याचे दिसत आहे. या गोळ्यांमुळे मॉलची काच फुटली आहे. 'एजे' फर्निचर मॉल चे मालक अशोक नैन हे एमडी ड्रग्स तस्कर असल्याचा उल्लेख करत हा केवळ ट्रेलर आहे, यानंतर थेट गोळी डोक्यात असेल, असा इशारा बिश्नोई गँगकडून देण्यात आला आहे. लीप समोर

पिंपरी चिंचवडमध्ये फर्निचर वर केलेल्या गोळीबाराची जबाबदारी लॉरेन्स बिष्णोई गँगने स्वीकारली आहे. या अनुषंगाने लॉरेन्स बिष्णोईचा भाऊ आरजू बिष्णोई याच्या नावाने एक ऑडिओ समोर आलाय. जो आमच्या विरोधात आहे, त्याची आणि आमची लवकरचं भेट होईल. असा इशारा ही या ऑडिओद्वारे देण्यात आलाय. हा ऑडिओ खरंच लॉरेन्स बिष्णोई गँगशी संबंधित आहे का? याची पुष्टी करत नाही.

# पुण्यातील गर्ल्स हॉस्टेलबाहेरील 'त्या' बंद बॉक्सचं गूढ अखेर उलगडलं

पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी

शहरातील संत तुकाराम नगरमधील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या राजे राजेश्वरी गर्ल्स हॉस्टेलच्या गेटवर सकाळी सव्वा आठच्या सुमारास एक मोठा गिफ्ट बॉक्स आढळून आल्याने परिसरात प्रचंड खळबळ उडाली होती. दरम्यान या प्रकरणात एक महत्त्वाची बाब समोर आली आहे.

नुकत्याच पुण्यात घडलेल्या बॉम्बच्या अफवा आणि घटनांच्या पार्श्वभूमीवर या बॉक्समुळे काही काळ भीतीचं वातावरण निर्माण झालं होतं. हॉस्टेलच्या मुख्य गेटवर कोणीतरी अज्ञात व्यक्ती हा मोठा बॉक्स ठेवून गेली होती. सुरक्षा रक्षकाला या बेवारस बॉक्सचा संशय आल्याने त्याने तातडीने पोलिसांशी संपर्क साधला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस आणि सुरक्षा यंत्रणा तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या. पोलिसांनी




खबरदारीचा उपाय म्हणून परिसराची नाकेबंदी केली आणि अत्यंत काळजीपूर्वक त्या संशयास्पद बॉक्सची तपासणी केली. जेव्हा पोलिसांनी तो बॉक्स उघडला, तेव्हा त्यात एक मोठा टेडी बियर असल्याचं समोर आलं. बॉक्समध्ये कोणतीही धोकादायक किंवा संशयास्पद वस्तू नसल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलीस आणि विद्यापीठ प्रशासनाने सुटकेचा निश्वास सोडला. हा बॉक्स हॉस्टेलमधीलच एका विद्यार्थिनीसाठी पाठवण्यात आल्याचा प्राथमिक अंदाज असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.अखेर अज्ञात व्यक्तीने ठेवलेल्या त्या बॉक्समध्ये टेडिबियर असल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे. दरम्यान हा टेडिबिअर वसतिगृहातील विद्यार्थिनीसाठी ठेवण्यात आल्याचं सांगितलं जात आहे. अद्याप तो टेडिबियर कुणी आणि कुणासाठी ठेवला होता याबाबत कोणतीही माहिती कळू शकलेली नाही. पोलीस या प्रकरणात तपास करीत आहेत.

# पिंपरी-चिंचवडमध्ये सायकल ते बैलगाडी आंदोलन

पिंपरी: देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी आणि पश्चिम आशियातील संकटामुळे उद्भवू शकणाऱ्या संभाव्य परिणामांना तोंड देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना इंधनाचा वापर कमी करण्याचे आवाहन केले होते. सार्वजनिक वाहतूक, मेट्रो, बससेवा, कारपूलिंग आणि इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढविण्यावर पंतप्रधानांनी भर दिला आहे. या पार्श्वभूमीवर, शुक्रवारी (दि. १५) पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या दिवशी महापालिका परिसरात प्रचंड नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. एका बाजूला पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रतिसाद, तर दुसऱ्या बाजूला इंधन दरवाढ आणि भष्टाचाराच्या मुद्द्यावरून सत्ताधारी अन विरोधक



आमनेसामने आले होते.

पंतप्रधानांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत महापौर रवी लांडगे यांनी आपला नियोजित विदेश दौरा रद्द करण्याचा मोठा निर्णय घेतला. आज पर्यावरणपूरक वाहतुकीचा संदेश देण्यासाठी महापौर लांडगे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी हे दोघेही आज चक्क सायकलवरून महापालिका भवनात पोहोचले. तसेच, आरपीआईचे नगरसेवक धर्मपाल तंतरपाले यांनीही सायकलवरून येत या उपक्रमात सहभाग घेतला.

इंधन बचतीच्या या मोहिमेत इतर लोकप्रतिनिधींनीही वेगवेगळ्या प्रकारे सहभाग नोंदवला. माजी महापौर शकुंतला धराडे आणि शिक्षण विभागाच्या सभापती रवीना अंगोळकर यांनी व्हीआयपी वाहनांचा त्याग करून ऑटो रिक्षाने प्रवास केला. सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, शहर सुधारणा समितीचे अध्यक्ष संजय काटे व काही नगरसेवकांनी मेट्रोने तसेच, पीएमपीएल बसने प्रवास केला. अनेक नगरसेवकांनी इंधनाची बचत करण्यासाठी कार पूलिंगचा (एकाच गाडीतून अनेक जणांनी प्रवास करणे) पर्याय निवडला. उदय गायकवाड व कृष्णा सुरकुले यांनी चारचाकी वाहन टाळून दुचाकीवर महापालिका गाठली.


विरोधकांनी मात्र या इंधन बचतीच्या आवाहनाचा निषेध करत वाढत्या पेट्रोल-डिझेल दरावरून सत्ताधाऱ्यांना घेरले. राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नगरसेवकांनी थेट बैलगाडीवरून महापालिकेत दाखल झाले. सत्ताधारी भाजपाच्या उधळपट्टीवर टीका केली. ते अनोखे आंदोलन पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

# प्रतिनियुक्तीवरील शिक्षकांना मूळ ठिकाणी परतण्याचे आदेश; मे महिन्याचे वेतन थांबवण्याचा इशारा

पुणे । प्रतिनिधी

निवडणुकीसह विविध प्रकारच्या शासकीय कामासाठी प्रतिनियुक्ती झालेल्या शिक्षकांना आता त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी परत जावे लागणार आहे. शिक्षक मूळ जागेवर रुजू न झाल्यास संबंधितांचे मे महिन्यापासूनचे वेतन न देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी याबाबत संयुक्त परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षकांची निवडणूक आणि अन्य कामांसाठी प्रतिनियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे शैक्षणिक कामकाजावर परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर, प्रतिनियुक्तीवर असलेल्या शिक्षकांबाबत क्षेत्रीय कार्यालयांनी सादर केलेल्या माहितीचा अहवाल शासनास सादर केला आहे.




त्यानंतर ९ मे रोजी झालेल्या बैठकीत निवडणूक आणि अन्य कामावर प्रतिनियुक्त असलेल्या सर्व शिक्षकांना त्यांचे मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी कार्यमुक्त करण्याचे निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार सर्व संबंधित शिक्षकांना त्यांच्या मूळ नेमणुकीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी तत्काळ कार्यमुक्त करण्याबाबत कार्यवाही करावी. सादर केलेल्या माहितीव्यतिरिक्त शिक्षकांची प्रतिनियुक्ती शासकीय कार्यालयात असल्यास त्या कार्यालयप्रमुखांशी संपर्क करून त्यांनाही कार्यमुक्त करण्याचे निर्देश द्यावेत, असे स्पष्ट केले आहे. कार्यमुक्त केल्याचे आदेशानंतरही शिक्षक त्यांच्या मूळ जागी रुजू न झाल्यास त्या शिक्षकांचे मे महिन्याचे वेतन दिले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.तसेच त्याबाबत वेतन अधीक्षक, भविष्य निर्वाह निधी पथक यांनाही आदेश द्यावेत. त्याशिवाय निवडणूक व अन्य कामांसाठी प्रतिनियुक्तीने कार्यरत स्थानिक स्वराज्य संस्था आणि खासगी शिक्षण संस्थांमधील शिक्षक, मूळ नेमणुकीच्या जागी रुजू झालेल्या शिक्षकांचा एकत्रित अहवाल ३१ मेपर्यंत सादर करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

# एचएसआरपीसाठी पुन्हा एकदा मुदतवाढ; 'या' तारखेनंतर भरावा लागेल मोठा दंड

**पुणे । प्रतिनिधी**

राज्य परिवहन विभागाने २०१९ पूर्वीच्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्यास पुन्हा दीड महिन्याची म्हणजेच दि. ३० जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे वाहनचालकांना दिलासा मिळाला असून, १ जुलैपासून एचएसआरपी नंबर प्लेट नसलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाईचा बडगा उगारण्यात येणार असल्याचे राज्य परिवहन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.




राज्यात २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर बंधनकारक आहे. मात्र, पुणे शहरासह राज्यातील बहुतांश जिल्ह्यात या एचएसआरपी बसवून घेण्यात काही वाहनचालकांमध्ये उदासीनता दिसून आली. परिणामी निम्याहून अधिक वाहनांना अद्याप एचएसआरपी नंबर बसलेली नाही. त्यानुसार राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी एचएसआरपी नंबरप्लेट बसविण्यास ३० जूनपर्यंत मुदत दिल्याचे सांगितले. दरम्यान, पुणे शहरात २५ लाखांपेक्षा जास्त वाहनांना ही नंबरप्लेट बसवावी लागणार आहे. मागील दीड वर्षात अनेकवेळा नंबर प्लेट बसविण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली, तरीही आतापर्यंत केवळ ११ लाख ३४ हजार ६८४ वाहन मालकांनी एचएसआरपीसाठी नोंदणी केली आहे. त्यातील ११ लाख ३२ हजार १०८ जणांना नंबरप्लेट बसविण्यास वेळ दिली असून, त्यातील ९ लाख ३० हजार २६९ वाहनमालकांनी नंबरप्लेट बसवून घेतली आहे. आजही ६३ टक्के वाहनमालकांनी नोंदणी केलेली नाही. त्यामुळे पुढील दीड महिन्यात नोंदणी न केलेल्या जवळपास १६ लाख वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# देशात आर्थिक मंदीचा धोका? शरद पवारांनी उपस्थित केला गंभीर प्रश्न

पुणे । प्रतिनिधी

इराण -अमेरिका युद्धामुळे भारत देशातही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचा अर्थव्यवस्थेवरही विपरित परिणाम होण्याचा धोका आहे. त्याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन व परकीय चलन बचतीबाबत केलेल्या आवाहनाची देशभर चर्चा आहे. हे आवाहन सर्वांनीच गांभार्याने घेणे गरजेचे आहे. पंतप्रधानांनी सर्वपक्षीय बैठक बोलवून सर्वांना विश्वासात घ्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली आहे.

नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या काळात इंधन बचतीबाबतचा विचार सत्ताधाऱ्यांना का आला नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. पुण्यातील पत्रकार परिषदेत पवार यांनी विविध विषयांवर भाष्य केले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देशातील नागरिकांना इंधन जपून वापरण्याचे आवाहन केले आहे. त्यावर भाजपच्या काही मंत्र्यांनी गाड्याचा ताफा कमी केला. काहींनी ताफाच सोडला. कोणी पायी चालतोय, कुणी दुचाकीवर जातोय, असे चित्र पाहायला मिळत आहे.



एका दिवसाच्या बचतीने फारसा फरक पडणार नाही. त्यात किती सातत्य राहील, हे महत्वाचे आहे. त्यामुळे पंतप्रधानांच्या आवाहनावर नेते, मंत्र्यांनी केवळ दिखाऊपणा करून चालणार नाही, असा टोलाही पवार यांनी लगावला. इंधन बचतीबाबत निवडणुकांच्या कालावधीत सत्ताधाऱ्यांनी जनतेत जनजागृती करायचा हवी होती. मात्र, प्रत्यक्षात तसे का झाले नाही, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

पंतप्रधान संसदेत विश्वासदर्शक किंवा अविश्वास ठराव वगळता फारसे उपस्थित राहात नाहीत.

पंतप्रधान नरेंद्र मोदी.

सर्वपक्षीय बैठकांनाही ते उपस्थित राहात नाहीत, अशी टीका करून देशाच्या प्रमुखांनी सातत्याने संसदेत उपस्थित राहणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी देशाच्या लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याबाबत वापरलेली भाषा अयोग्य आहे. विरोधी पक्षनेते हे घटनात्मक आहे. त्यामुळे त्यांच्याबद्दल टिंगलटवाळी करणे योग्य नाही, असेही पवार यांनी नमूद केले. रुपयाची घसरण का होतेय, याचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

सोन्याच्या खरेदीवर थेट आक्षेप नाही.

मात्र, अनावश्यक खर्च कमी करण्यावर सर्वांनीच भर दिला पाहिजे. देशातील परिस्थिती गंभीर असल्याने सर्वांनी जबाबदारीने वागावे लागेल. आर्थिक मंदी येऊ नये, यासाठी नागरिकांच्या सहकार्याची अपेक्षा आहे, असे पवार म्हणाले. गेल्या चार वर्षांपासून माझ्या ताफ्यात फक्त तीनच गाड्या आहेत. स्वतःला बुलेटप्रूफ गाडी दिली होती. मात्र, ती नाकारून स्वतःची गाडी वापरत असल्याचे पवार यांनी नमूद केले आहे.

ताफ्यात बदल करण्याची विनंती विशेष सुरक्षा विभागाकडे करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. काही राज्यांतील निवडणुकांचे निकाल अपेक्षेपेक्षा वेगळे लागल्याचे सांगून नवीन पक्षांना कॉंग्रेसने दिलेल्या पाठिंब्यामुळे इंडिया आघाडी काही ठिकाणी नाराजी आहे. मात्र, ती दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही पवार यांनी स्पष्ट केले.

# पार्थ पवार, सुनेत्राकाकींशी 'त्या' विषयावर चर्चा करायची इच्छा नाही - रोहित पवार

पुणे : अजित पवारांचे अपघात प्रकरण सातत्याने लावून धरणाऱ्या आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांच्याबाबत एक मोठं वक्तव्य केलं आहे. पार्थने व्हीएसआर विमानातून प्रवास केला, तर एका कार्यक्रमात सुनेत्राकाकी या नागरी उड्डाणमंत्री राममोहन नायडू यांच्या शेजारी बसल्याने या विषयावर कुणाशीही चर्चा करायची इच्छा नसल्याचं वक्तव्य रोहित पवार यांनी केलं. सुनेत्रा पवारांनी जर अजितदादांच्या अपघाताची चौकशी लावली तर त्यांचा सत्कार करेन असंही रोहित पवार म्हणाले.

काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादीचे खासदार रोहित पवार यांनी व्हीएसआर विमानातून प्रवास केल्याचं समोर आलं. याच कंपनीच्या विमानातून प्रवास करताना अजित पवारांचा अपघात झाला होता. आमदार रोहित पवारांनी त्यानंतर व्हीएसआर कंपनीवर अनेक आरोप केले होते. तर दुसरीकडे, या विमानाच्या मालकाचे आणि केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री राममोहन नायडू यांचे संबंध असल्याचा आरोपही रोहित पवारांनी केला होता. आसामच्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीच्या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या केंद्रीय उड्डाणमंत्री राममोहन नायडू यांच्याशेजारी



बसल्याचं दिसून आलं. त्यानंतर आमदार रोहित पवारांनी त्यावर जाहीर नाराजीही व्यक्त केली होती. आता या दोन्ही विषयांवर त्यांनी प्रतिक्रिया दिली.आमदार रोहित पवार म्हणाले की, पार्थ पवारने व्हीएसआर विमानातून प्रवास केला. तर काही दिवसांपूर्वी सुनेत्रा पवार या राममोहन नायडू यांच्याशेजारी बसल्याचं दिसून आलं. या विषयावर मी कुणाशीही चर्चा केली नाही, तशी इच्छादेखील नाही. अजितदादांच्या अपघाताच्या प्रश्नी आम्ही न्यायालयात जातोय, सीआयडीकडे जातोय. लोकांपर्यंत जाऊन प्रामाणिकपणे लढतोय. असं असताना या गोष्टी समोर दिसतात त्यावेळी आम्ही लढायचं की नाही असा प्रश्न पडतो. अजितदादांच्या अपघाताची केस जर येत्या २८ मे पर्यंत सीबीआयला राज्य सरकारने सुपूर्त केली तर मी स्वतः सुनेत्राकाकींचा सत्कार करेन, असं वक्तव्य रोहित पवार यांनी केलं. दोन दिवसांपूर्वी खासदार सुनील तटकरे यांनी शरद पवारांची भेट घेतली होती. ही भेट पवारसाहेबांच्या तब्येतीची चौकशी करण्यासाठी घेतली होती अशी माहिती तटकरेंनी दिली. त्यावर रोहित पवारांनी प्रतिक्रिया दिली. रोहित पवार म्हणाले की, मला जी माहिती मिळाली त्यानुसार सुनील तटकरे यांच्यासोबत प्रफुल पटेलही त्यावेळी उपस्थित होते. परंतु, पवारसाहेबांनी सांगितल्याप्रमाणे त्यामध्ये कोणतीही राजकीय चर्चा झाली नसेल. ती भेट केवळ तब्येतीची चौकशी करण्यासाठी झाली असेल.

# बार्टीच्या लोणावळा कार्यशाळेत लाखोंची उधळपट्टी; खासगी रिसॉर्ट खर्चावर चौकशीची मागणी

पुणे: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) च्या वतीने राज्यातील समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांसाठी लोणावळ्यातील एका खासगी लक्झरी रिसॉर्टमध्ये आयोजित करण्यात आलेल्या दोनदिवसीय कार्यशाळेत मोठ्या प्रमाणावर शासकीय निधीची उधळपट्टी झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी विशेष लेखापरीक्षण तसेच सखोल चौकशीची मागणी रिपब्लिकन विद्यार्थी सेनेचे प्रदेशाध्यक्ष विवेक बनसोडे यांनी केली आहे.

विवेक बनसोडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांनुसार, शासनाकडे 'यशदा'सारखी स्वतःची प्रशिक्षण संस्था आणि सुविधा उपलब्ध असताना ही कार्यशाळा लोणावळ्यातील आलिशान खासगी रिसॉर्टमध्ये का आयोजित करण्यात आली, असा सवाल उपस्थित केला जात आहे. ८ आणि ९ मे रोजी पार पडलेल्या या दोनदिवसीय कार्यशाळेसाठी अंदाजे २० ते २५ लाख रुपये खर्च करण्यात आल्याची



माहिती समोर येत आहे.

प्रत्यक्षात कार्यक्रमात केवळ काही सादरीकरणे आणि भाषणे झाली असून, एवढ्या मोठ्या खर्चाचे औचित्य काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. तसेच, रिसॉर्टचे बुकिंग थेट न करता मध्यस्थांमार्फत केल्याने कमिशन व्यवहार झाल्याचा संशयही व्यक्त केला आहे. संबंधित लक्झरी हॉटेलमधील एका खोलीचे भाडे सुमारे ९,६०० रुपये असल्याचे सांगितले जात आहे.बार्टी ही संस्था अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या कल्याणासाठी कार्यरत आहे. मात्र, विद्यार्थ्यांच्या विविध योजनांसाठी निधी वेळेवर उपलब्ध होत नसताना अधिकाऱ्यांच्या कार्यशाळांवर मोठा खर्च करण्यात येत असल्याने नाराजी व्यक्त केली जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून जबाबदारांवर कारवाई करावी, अशी मागणी बनसोडे यांनी केली आहे. बार्टी संस्थेमध्ये नियमबाह्य नियुक्त्या, आर्थिक अनियमितता आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांचे संगनमत होत असल्याचा आरोपही विवेक बनसोडे यांनी केला आहे. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.